अतारांकित प्रश्नोत्तरांची १५ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

हिंगणघाट (जि. वर्धा) येथील जिनप्रेस महिला कामगार व कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढणेबाबत

(१) १२७ (३०-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील जिनप्रेस महिला कामगार व कर्मचारी यांना सन २००३ पासून कामावरुन कायमचे कमी केल्यामुळे सदर कामगारांनी सेवाखंडीत कालावधीचा मोबदला देण्याबाबत तसेच गुजरात पॅटर्न अंतर्गत मुख्य सचिव यांनी शासनाला सादर केलेला रु.१२ कोटी ६१ लक्ष रुपयेचा प्रस्ताव लागू करण्याबाबत दिनांक १६ मार्च, २००९ रोजी वा त्या दरम्यान विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिनप्रेस महिला कामगार व कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पणन व राजशिष्टाचार मंत्री यांना दिनांक ३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर जिनप्रेस महिला कामगार व कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (२६-०९-२०२५) : (१) महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघात हंगाम २००२-०३ पर्यंत कापूस खरेदी प्रक्रियेच्या कामाकरीता रोजंदारी मजूर नेमण्यात आले होते. त्यानंतर महासंघास आवश्यकता नसल्याने मजूर संख्येत कपात करण्यासाठी प्रोत्साहन योजना लागू करुन त्याअंतर्गत एकूण ४२०० मजूरांना रु.१२ कोटी ६१ लक्ष इतकी रक्कम देण्याचा प्रस्ताव महासंघाने दि.१२.०२.२००७ व दि.२९.१२.२००७ रोजी शासनाला सादर केला होता.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कापूस पणन महासंघाने मजुरांच्या संख्येत कपात करण्यासाठी सादर केलेला प्रोत्साहन योजनेचा प्रस्ताव शासनाने अमान्य केला असून, तसे शासन पत्र दि.०६.११.२००७ व दि.२०.०६.२००८ अन्वये महासंघास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शालेय अभ्यासक्रमात रस्ते परिवहन नियमाची माहिती समाविष्ट करण्याबाबत

(२) ६२२ (३०-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय अभ्यासक्रमात रस्ते परिवहन नियमाची माहिती समाविष्ट करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत रस्ते अपघातांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून अपघातांमुळे अनेक नागरिकांचे मृत्य झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२९-०९-२०२५) : (१) विभागाच्या अभिलेखात सदर निवेदन आढळून आले नाही.
(२) व (३) प्रचलित अभ्यासक्रमात इयत्ता ६ वी ते ८ वी कार्यानुभव अंतर्गत घ्यावयाच्या उपक्रमामध्ये इतर क्षेत्र म्हणून आवश्यकतेनुसार क्षेत्र निवडीची संधी देण्यात आलेली आहे. इतर क्षेत्रामध्ये स्काउट /गाईड /RSP (नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा) या उपक्रमाचा समावेश आहे.

माध्यमिक स्तरावर इयत्ता ९ वी ते १० वी साठी नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा हा वैकल्पिक श्रेणी विषय म्हणून ठेवण्यात आलेला आहे. सदर इयत्तांसाठी या विषयाच्या कार्यपुस्तिकाही आहेत. या विषयांची प्रात्याक्षिके व उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येते.

इयत्ता १ ली ते १० वी च्या प्रचलित अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तकामध्ये रस्ता सुरक्षा तसेच वाहतूक नियमांचे पालन यावर आधारित आशयाचा समावेश करण्यात आलेला आहे. सोबत तक्ता देण्यात येत आहे.

सद्य:स्थितीमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्य अभ्यासक्रम आराखड्यावर आधारित शालेय शिक्षणाच्या नवीन अभ्यासक्रमाची/पाठ्यक्रम नुसार शालेय माध्यमिक स्तरावर इयत्ता ९ वी ते १० वी साठी नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा हा वैकल्पिक श्रेणी विषय म्हणून ठेवण्यात आलेला आहे.

प्रत्येक शनिवारी शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या "आनंददायी शनिवार" या उपक्रमांतर्गत "रस्ता सुरक्षा आपली सुरक्षा" व ट्रैफिक दादा - सिग्नल दादा "या उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुणे शहरातील शाळेतील विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचार झाल्याबाबत

(३) ७७१ (०५-०५-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील नामांकित शाळेतील विद्यार्थ्यावर झालेल्या लैंगिक अत्याचाराबाबत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळा प्रशासनावर कोणती कारवाई करण्यात येईल तसेच त्यांच्यावर कोणत्या प्रकारच्या जबाबदाऱ्या निश्चित केल्या जातील,
(२) असल्यास, अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत म्हणून राज्यभरातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कठोर उपाययोजना राबवल्या जातील, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाळांमध्ये नियुक्त शिक्षकांच्या पार्श्वभूमी तपासणीसाठी कोणती कायदेशीर प्रक्रिया अवलंबण्यात येईल तसेच पीडित विद्यार्थ्याला व त्याच्या कुटुंबाला मानसिक आधार व न्याय मिळवून देण्यासाठी शासन कोणते पाऊल उचलणार आहे,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२९-०९-२०२५) : (१) सदर प्रकरणातील संबंधित आरोपी व शाळा व्यावस्थापन यांच्या विरुध्द फौजदारी स्वरूपाची कारवाई सुरू करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात सर्वसमावेशक सूचना दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, प्रत्येक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याची नियुक्ती करताना त्यांची पार्श्वभूमी, पूर्वीची सेवा, त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी याची पडताळणी करून, नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल पोलीस यंत्रणेमार्फत प्राप्त करून घेणे आवश्यक राहील असे दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सूचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अभ्यासक्रमात नव्याने धोरण आणण्याबाबत

(४) ९२४ (३०-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकीकडे जग ‘हायटेक’ झाले असताना विद्यार्थ्यांना संगणक, अवकाशविज्ञान, कोडिंग यासारखी आधुनिक कौशल्ये शाळेत शिकविण्याऐवजी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पारंपारिक कौशल्ये अभ्यासक्रमात आणण्याचे शासनाने धोरण तयार केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकीकडे प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम व मूल्यमापन अतिशय सोपे तर त्या तुलनेत माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रम व मूल्यमापन आव्हानात्मक झाल्याचे ‘नॅस’ (नॅशनल अचिव्हमेंट सर्व्हे) तसेच ‘प्रथम’ या संस्थाच्या अहवालांतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी राज्याचे शैक्षणिक धोरण नव्याने ठरविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२९-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
i) असरमार्फत इयत्ता दुसरी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सर्वेक्षणात विचार केला जातो. यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तराचा विचार केला जात नाही.
ii) राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) यामध्ये उच्च माध्यमिक स्तरावरील सर्वेक्षण केले जात नाही फक्त माध्यमिक स्तराचा विचार यामध्ये केला जातो. सदर सर्वेक्षण हे सन २०२१ मध्ये करण्यात आले होते यामध्ये अध्ययन निष्पत्तीवर आधारित संपादणुकता पडताळण्यात आली होती. सद्य:स्थितीत दिनांक ४ डिसेंबर, २०२४ रोजी देशामध्ये सर्वेक्षण झालेले आहे याचा अहवाल अजून प्रसिद्ध होणार आहे.
iii) प्राथमिक स्तरावरून माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर जात असताना अभ्यासक्रमाची काठीण्य पातळी व मूल्यांकनाचे निकष आणि स्वरूप यामध्ये वाढ होत असते. यामुळे प्राथमिक स्तरावरील संपादनापेक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील संपादणूकता ही थोडी कमी होत जाताना दिसते कारण यामध्ये विषयाची व्याप्ती व मूल्यांकनाचे निकष याची काठीण्य पातळीही वाढवण्यात आलेली असते.
(३) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (२०२३), राज्य अभ्यासक्रम आराखडा (२०२४) मध्ये व्यवसाय शिक्षणाची नवकल्पना मांडली आहे.

शाळांमध्ये इयत्ता ६ वी पासून व्यवसाय शिक्षण अनिवार्य केले आहे. इ ६ वी ते १० वी पर्यन्त विद्यार्थ्यांना केवळ एका विशिष्ट कौशल्याचे शिक्षण न देता त्यांची विविध व्यवसाय कामे करण्याची क्षमता वाढवण्यासाठी अभ्यासक्रमाची रचना केली आहे. कौशल्यांबरोबर एखादे काम व्यवस्थित करता येणे, त्याची

गरज ओळखता येणे, त्यांचे नियोजन करता येणे, सुरक्षा साधनांचा वापर करता येणे, केलेल्या कामाचे योग्य पध्दतीने सादरी-करण करता येणे ही सर्व सॉफ्ट स्किल्स पण केवळ विशिष्ट कौशल्य शिक्षणाबरोबर महत्वाची आहेत. त्यामुळे इ. ६ वी ते १० वी पर्यन्त विद्यार्थ्यांना तीन व्यवसाय क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण द्यायचे उद्दिष्ट आहे.

विद्यार्थ्यांना शेती विषयक, यंत्र आणि सामुग्री विषयक आणि मानवी सेवा या प्रत्येक क्षेत्रातील एक प्रकल्प दरवर्षी करावयाचा आहे.

राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ आणि त्यानुसार बनत असलेल्या अभ्यासक्रमात यंत्र आणि सामुग्री या कार्य क्षेत्रात आपण गेम आणि ॲनिमेशन या मध्ये प्रोग्रामिंग आणि कोडिंग तसेच स्क्रैच सारखे programming भाषा यांचे प्रकल्प करण्याचे प्रकल्प दिले आहेत. तसेच रोबोटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स यांचा समावेश आहे.

शेती सारख्या परंपरागत विषयात सुध्दा नवीन तंत्रज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना होईल व कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारित साधने कशी वापरायची यांचा सुध्दा समावेश केला आहे.

वरील प्रकल्पातून विद्यार्थ्याना २१ व्या शतकासाठी आवश्यक असलेले कौशल्ये, जसे की जीवन कौशल्ये, योग्य माहीती मिळवणे आणि त्यांचे उपयोजन करणे, दस्तऐवजीकरण करणे, सादरीकरण करणे, संवाद कौशल्ये, एखाद्या गोष्टीची गरज ओळखणे. या प्रकारचे कौशल्ये ज्याला डिझाईन थिंकिंग, संबोधले जाते हे आत्मसात होतील असे पाहिले आहे.

इ. ६ वी ते १० वी पर्यन्त विविध प्रकल्प केल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडत्या व्यवसायाची किंवा करियर ची निवड करणे सोईचे होईल. त्या आधारे इ. ११ वी मध्ये त्यांना विशिष्ट व्यवसाय कौशल्य अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री महात्मा बसवेश्वर यांच्या "वचन" साहित्याचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्याबाबत

(५) १९६१ (०५-०५-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री महात्मा बसवेश्वर यांच्या "वचन" साहित्याचा इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या अभ्यासक्रमात समावेश करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रान्वये दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारासच्या मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री महात्मा बसवेश्वर यांनी लिहिलेल्या "वचन" साहित्यामधून मानवतेचा संदेश, समता, बंधुता आणि नीतिमूल्याचा प्रचार-प्रसार झाला असून या वचनांमधून सामाजिक बांधिलकी, सुसंवाद आणि शाश्वत विकासाचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश साध्य होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या साहित्याचा समावेश इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या इतिहास विषयाच्या पाठ्यपुस्तकामध्ये केल्यास, विद्यार्थ्यांमध्ये नीतिमूल्ये रुजवून त्यांना आदर्श नागरिक बनविण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने श्री. महात्मा बसवेश्वर यांच्या वचन साहित्याचा इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या अभ्यासक्रमात समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२९-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.
(४) प्रचलित अभ्यासक्रमानुसार श्री. महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याच्या माहितीबाबत आशयाचा समावेश इयत्ता ७ वी इतिहास या विषयाच्या पाठ्यपुस्तकामध्ये प्रकरण ३ “धार्मिक समन्वय” या पाठात करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्य अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण वर आधारित इयत्ता ३ री ते १० वी साठी नवीन अभ्यासक्रम/पाठ्यक्रम निर्मितीची प्रक्रिया सुरू आहे. सदर अभ्यासक्रमाची रचना करताना शालेय अभ्यासक्रमात मूल्यांचा समावेश करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुलाची जबाबदारी राज्य क्रीडा विभागाकडे सोपविण्याबाबत

(६) ३२७९ (०५-०५-२०२५). श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी विधानसभा क्षेत्रात क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी सन २०१३ मध्ये बांधण्यात आलेले भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुलाची जबाबदारी एका खाजगी कंपनीला देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रीडा संकुलाची जबाबदारी खाजगी कंपनीकडे दिल्यामुळे व चुकीच्या खाजगीकरणाच्या निर्णयामुळे सर्वांसाठी खुले असलेल्या क्रीडा संकुलाचे खाजगी क्लबमध्ये रुपांतर झाल्याने त्याच्या दरमहा शुल्कात देखील वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक नागरिकांचा खाजगीकरणास विरोध असून सदर संकुलाच्या देखभालीची जबाबदारी परत राज्य क्रीडा विभागाकडे सोपविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने क्रीडा संकुलाची जबाबदारी परत राज्य क्रीडा विभागाकडे सोपविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०७-१०-२०२५) : (१), (२), (३) व (४) भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुलाच्या दैनंदिन संचालन व व्यवस्थापनासंदर्भात दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ रोजी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांच्या अध्यक्षतेखालील क्रीडा संकुल समितीच्या निर्णयानुसार निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून मे. ऑस्कॉर्प कन्स्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजी १५ वर्षांच्या कालावधीसाठी नोंदणीकृत करारनाम्यान्वये संकुल हस्तांतरित करण्यात आले आहे. त्यानुसार विविध खेळांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा वापराचे दर निश्चित केले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

बदलापूर (जि.ठाणे) येथील उल्हास नदी पूर नियंत्रणरेषेचे नव्याने सर्वेक्षण करण्याबाबत

(७) ३४१२ (०१-०५-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) : सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील खरवई, मांजर्ली, वालिवली, सोनिवली, एंरजाड, बदलापूर गाव, हेंद्रेपाडा, बॅरेज रोड, रमेशवाडी, सानेवाडी, स्टेशन परिसर, शनीनगर, मोहनानंदनगर आदी भागातील शेकडो एकर जमीन पूर नियंत्रणरेषेत आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील संपूर्ण जमिनी पूर नियंत्रणरेषेमुळे बाधित होणार असल्याने या भागात कोणतेही बांधकाम करण्यास परवानगी मिळणार नसल्याने बांधकाम व्यावसायिक, लहान-मोठे भूखंडधारक तसेच ज्यांच्या वडिलोपार्जित जमिनी आहेत अशाजमिनीधारकांचे नुकसान होणार असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जलसंपदा विभागाने स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता चुकीच्या पद्धतीने पूर नियंत्रणरेषा आखली असल्याने उल्हास नदीवर पूर नियंत्रणरेषेचे फेर सर्वेक्षण करण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून मागणी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर उल्हास नदी पूर नियंत्रणरेषेचे फेर सर्वेक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. गिरीश महाजन (१०-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक, दि.०३.०५.२०१८ मधील तरतूदीनुसार पुराची तीव्रता कमी करण्यासाठी व जिवित व वित्तहानी रोखण्यासाठी नदीच्या नियंत्रण क्षेत्रात सार्वजनिक हिताच्या दृष्टीने काही अपरिहार्य बांधकामे वगळता इतर बांधकामे प्रतिबंधित आहेत.

(३) हे, अंशत: खरे आहे.

(४) स्थानिक लोकप्रतिनिधी व जनसामान्यांच्या मागणीनुसार तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८.०९.२०२२ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार, उल्हास नदीच्या पूरेरेषेचे फेरसर्वेक्षण हे आय.आय.टी., रुरकी या संस्थेकडून करावे व याबाबतचा खर्च फेरसर्वेक्षणाची मागणी करणाऱ्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेनी करावा, असे निर्देश शासनाच्या दि.०८.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रीय कार्यालयास दिले आहेत.

त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर अंदाजपत्रक तयार करुन कुळगाव बदलापूर नगरपरिषदेची मान्यता व निधी मिळणेसाठी क्षेत्रीय कार्यालयाने मुख्याधिकारी, कुळगाव बदलापूर नगरपरिषद, बदलापूर ठाणे यांना दि.२१.०४.२०२३ व दि.२५.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदर कामास नगरपालिकेमार्फत मान्यता व निधी उपलब्ध झाल्यानंतर पूढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

कृष्णा खोरे महामंडळ अंतर्गत गुंजवणी प्रकल्पाच्या जलवाहिनीबाबत

(८) ३७६७ (३०-०४-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा खोरे महामंडळ अंतर्गत गुंजवणी प्रकल्पाच्या जलवाहिनीचे काम निधी अभावी अतिशय संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुंजवणी प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव महामंडळांकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाला तात्काळ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.

गुंजवणी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांचा मंजूर संरेखेस विरोध तसेच लाभक्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी वाजेघर, वांगणी व शिवगंगा खोरे या उपसा सिंचन योजना प्राधान्याने पूर्ण करणेबाबतची मागणी यामुळे प्रकल्पाच्या कामास विलंब होत आहे.

(२) व (३) गुंजवणी प्रकल्पाचा तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव महामंडळाने राज्य तांत्रिक सल्लागार समिती - २, पुणे यांना सादर केला आहे. रा.तां.स.स.-२, पुणे यांचेकडून छाननीअंती महामंडळाकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावास शासन मान्यतेची कार्यवाही नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मांजरा प्रकल्प व मांजरा नदी (ता. केज, जि. बीड.) बॅरेजस करिता प्रणाली विकसित करणेबाबत

(९) ३७७० (३०-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांजरा धरण व मांजरा नदीवरील (ता. केज, जि. बीड.) सर्व बॅरेजससाठी पर्यवेक्षी नियंत्रण आणि डेटा संपादन SCADA (Supervisory Control and Data Acquisition) प्रणाली विकसित करण्यासाठी ०९.६२ कोटींचा प्रस्ताव मुख्य अभियंता, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी महामंडळास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वतंत्र प्रस्ताव तयार करून राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्या मार्फत मुल्यांकन करून घेऊन त्यानंतर नियामक मंडळाची मंजुरी घेऊन प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्याबाबत मुख्य अभियंता, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त बॅरेजससाठी SCADA (Supervisory Control and Data Acquisition) प्रणाली विकसित करण्याबाबतच्या प्रस्तावाचे त्वरित मुल्यांकन करून देण्याबाबत आदेश देऊन प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०८-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) मांजरा धरणामधील SCADA (Supervisory Control and Data Acquisition) प्रणालीचे काम धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत समाविष्ट असून सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि. ०१.०७.२०२४ रोजी दिले असून काम प्रगतीपथावर आहे.

तसेच मांजरा व तेरणा नदीवरील १९ बॅरेजेसअंतर्गत SCADA आधारित Centralised Dam Gate Control Management System विकसित करण्याची बंधारानिहाय अंदाजपत्रके विशेष दुरूस्ती अंतर्गत शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुरंदर आणि बारामती (जि. पुणे) तालुक्यातील कऱ्हा नीरा नदीजोड प्रकल्पाबाबत

(१०) ३७८३ (०१-०५-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर आणि बारामती (जि. पुणे) तालुक्यातील कऱ्हा - नीरा नदीजोड प्रकल्प राबवून दुष्काळी गावांसाठी सिंचनाची व्यवस्था करण्याची बाब जलसंपदा विभागाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव जलसंपदा विभागाने शासनास सादर केला आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन याबाबतचा प्रस्ताव तातडीने मागवून त्यास मान्यता देणार आहे काय, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०८-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) विषयांकित योजनेकरीता पाणी उपलब्धतेबाबत व योजनेच्या पर्यायांबाबत क्षेत्रीय कार्यालयाकडून सद्यस्थितीत प्राथमिक अहवाल तयार केला आहे. त्यानुषंगाने पाणी उपलब्धतेबाबत व प्रकल्प नियोजनाबाबत पर्यायांची छाननी करून तसेच कृष्णा पाणी तंटा लवादातील सर्वंकष तरतूदींचा विचार करून आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या योग्य पर्यायासह प्रस्ताव सादर करणेबाबत क्षेत्रीय कार्यालयास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नदीजोड प्रकल्प अभियान अंतर्गत प्रस्तावावर कार्यवाही होण्याबाबत

(११) ४०४० (३०-०४-२०२५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांनी नद्या जोड प्रकल्पाचा संकल्प बोलून दाखवला व त्या अनुषंगाने महाराष्ट्र पाणी परिषदेने याबाबतचे प्रस्तावाचे सादरीकरण केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील तुटीच्या खोऱ्यात पाणी आणण्यासाठी, केंद्रासह, राज्य सरकारला सादर केलेल्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील नद्याजोड प्रकल्पाबाबतचे प्रस्तावांचे स्वरुप काय असेल व यामधून उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे नियोजनाचे स्वरुप काय असेल,

(४) असल्यास, गोदावरी खोऱ्यामध्ये नदीजोड प्रकल्पाच्या अंतर्गत कोणते प्रस्ताव प्रस्तावित आहेत, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०८-२०२५) :

(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) १) वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्प (गोदावरी ते तापी खोरे):

गोदावरी खोऱ्यातील वैनगंगा उपखोऱ्यातील ६२.५७ टीएमसी पाणी नळगंगा उपखोऱ्यात वळविणे प्रस्तावित आहे. प्रकल्पाचे लाभक्षेत्र ३,७१,२७७ हेक्टर आहे. प्रकल्पामध्ये घरगुती वापरासाठी १.१३ टीएमसी व

औद्योगिक वापरासाठी १४ टीएमसी प्रस्तावित आहे

प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ८८,५७५ कोटी आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या भाग-१ अंतर्गत सर्वेक्षणाच्या रु. ३८१.१९ कोटी किंमतीच्या कामाकरीता दि. १३/०१/२०२५ रोजी अभिकरणास कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सर्वेक्षणाच्या कामास सुरुवात झालेली आहे.

२) दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्प (कोकण ते गोदावरी खोरे):

या योजनेद्वारे ३.५५ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात सोडण्यात येणार आहे.

प्रकल्पाद्वारे १२७५३ हे. क्षेत्रास (नाशिक-२९८७ हे., छत्रपती संभाजीनगर-९७६६ हे.) लाभ होणार आहे. प्रकल्पामध्ये स्थानिक वापरासाठी ०.४८ टीएमसी व औद्योगिक वापरासाठी ०.३२ टीएमसी प्रस्तावित आहे.

प्रकल्पाची किंमत रु. २२१३.५३ कोटी इतकी आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) मान्यता, पर्यावरण मान्यता, वन जमीन मान्यता इ. वैधानिक मान्यता नोव्हेंबर-२०२५ अखेर घेण्याचे नियोजन असुन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

३) दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्प (कोकण ते गोदावरी खोरे):

या योजनेद्वारे ५.६८ टीएमसी अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे प्रस्तावित आहे.

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील १७९६० हेक्टर, पालघर जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील स्थानिक ५२९० हेक्टर व मराठवाड्यातील जायकवाडी धरणाचे तुटीचे पुर्नजिवित क्षेत्र ५८४० हेक्टर असे एकुण ३३११० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. प्रकल्पामध्ये स्थानिक वापरासाठी ०.२३ टीएमसी व औद्योगिक वापरासाठी ०.५९ टीएमसी प्रस्तावित आहे.

प्रकल्पाची किंमत रू. १३४९७.२४ कोटी आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण(MWRRA) मान्यता, पर्यावरण मान्यता, वन जमीन मान्यता इ. वैधानिक मान्यता नोव्हेंबर-२०२५ अखेर घेण्याचे नियोजन असुन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

४) नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्प (कोकण ते तापी खोरे):

या योजनेद्वारे पश्चिम वाहिनी नार, पार व औरंगा या नदीखोऱ्यातून १०.६४ टीएमसी पाणी वापर प्रस्तावित आहे.

प्रकल्पामुळे एकूण ४९५१६ हे. क्षेत्रास (नाशिक-२५३१८ हे., जळगांव-१७०२४ हे., स्थानिक वापर-७१७४ हे.) सिंचनाचा लाभ होणार आहे. प्रकल्पामध्ये पिण्यासाठी १.४७ टीएमसी व औद्योगिक वापरासाठी १.७७ टीएमसी प्रस्तावित आहे.

शासन निर्णय दि.०५.०९.२०२४ अन्वये योजनेच्या किंमत रु. ७४६५.२९ कोटीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

५) पार-गोदावरी नदीजोड प्रकल्प (कोकण ते गोदावरी खोरे):-

पार-गोदावरी नदीजोड योजनेंतर्गत ३.०२ अघफू पाणी गोदावरी खो-यात वळविण्याचे प्रस्तावित आहे.

परंतु प्रत्यक्षात १.५९ टीएमसी पाणी उपलब्ध होत आहे.

पार-तापी-नर्मदा हा आंतरराज्यीय प्रकल्प (महाराष्ट्र व गुजरात) रद्द झाल्याने ९.७६ टीएमसी पाणी उपलब्ध होणार आहे.

त्यामुळे या पाण्याच्या उपलब्धेमधुन पार गोदावरी योजनेसाठी अधिकाधिक पाणी वापर करण्याच्या दृष्टीने तलांकाची मर्यादा न ठेवता सविस्तर अभ्यास करण्याच्या सुचना शासन पत्र दिनांक २३.०१.२०२५ नुसार देण्यात आल्या आहेत.

पश्चिम वाहिनी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये वळविण्याकरिता योजना सर्वेक्षणंतर्गत आहेत

६) कोकण (उल्हास खोरे व वैतरणा खोरे) - गोदावरी खोरे :

या योजनेंतर्गत वैतरणा खोऱ्यातील ३४.८० टीएमसी पाणी व उल्हास खोऱ्यातील १९.९० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे प्रस्तावित आहे.

त्यानुसार योजनेचे प्राथमिक अन्वेषण अहवाल तयार करुन, सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणाअंती सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या रू. ४८.६९कोटी किंमतीच्या कामास दि. ०३.०१.२०२५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सर्वेक्षणाच्या कामास सुरुवात झालेली आहे.

७) दमणगंगा - पिंजाळ (कोकण ते कोकण खोरे):-

या योजनेद्वारे दमणगंगा खोऱ्यातील २०.४४ टीमएसी पाणी वैतरणा खोऱ्यातील पिंजाळ धरणात आणून मुंबई शहराला पिण्याच्या पाण्यासाठी देणे प्रस्तावित आहे.

गुजरात राज्याची सहमती न झाल्याने प्रकल्प मार्गी लागू शकला नाही

ही योजना पूर्णपणे महाराष्ट्र राज्यांतर्गत करण्यासाठी पुनर्नियोजन (re-engineering) करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर सर्वेक्षणाच्या कामाकरिता दि. ०३.०२.२०२५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सर्वेक्षणाचे काम प्रगतीत आहे

८) कोयना धरणातून कोकणात वळविण्यात येणाऱ्या पाण्याचा वापर- (कोकण ते कोकण)

कोयना धरणातील ६७.५ टीएमसी पाणी वीजनिर्मिती करुन कोकणात वळविण्यात येते. हे पाणी विनावापर वशिष्ठी नदीमार्गे समुद्रामध्ये सोडण्यात येते.

या पाण्याचा कोकणातील सिंचन / बिगर सिंचन पाणी पुरवठा WAPCOS या केंद्र शासनाच्या संस्थेमार्फत अभ्यास करण्याचे प्रस्तावित आहे.

दि.२९.०८.२०२४ रोजी वॅपकॉस यांच्या सोबत सामंजस्य करार करण्यात आला असून सविस्तर प्रकल्प अहवाल जून २०२५ अखेर तयार करण्याचे नियोजन आहे.

९) प्रवाही वळण योजना (कोकण ते गोदावरी खोरे)

पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी तुटीच्या गोदावरी खो-यात वळविण्यासाठी ३० प्रवाही वळण योजनांची कामे विविध टप्पावर प्रगतीपथावर आहेत. याद्वारे ७.४० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे नियोजन आहे.

यापैकी १४ प्रवाही वळण योजनांची कामे भौतिकदृष्टया पूर्ण झालेली असून याद्वारे १.०८ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येत आहे.

तसेच ०८ प्रवाही वळण योजना बांधकामाधीन असुन याद्वारे २.०९ टीएमसी पाणी व ८ प्रवाही वळण योजना प्रस्तावित असुन याद्वारे ४.२३ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यांत वळविण्याचे नियोजन आहे.

(४) उपरोक्त मुद्दा क्रमांक तीन प्रमाणे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

समग्र शिक्षा योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समायोजित करणेबाबत

(१२) ४०९८ (०५-०५-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा योजनेअंतर्गत प्राथमिक शिक्षण परिषद सेवा नियमावली १९९४ मधील तरतूदीनुसार सुमारे ६,००० पदे गेल्या २१ वर्षांपासून अल्प मानधनावर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने ६,००० पदांपैकी ३,१०० विशेष शिक्षकांची पदे शासन सेवेत समायोजित करुन घेण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेंतर्गत विविध पदावर कार्यरत असलेल्या उर्वरित कर्मचाऱ्यांना शासन निर्णयाच्या अनुषंगाने शासकीय सेवेत तात्काळ समायोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२२-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
शासन निर्णय, दि. ०८.१०.२०२४ नुसार दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विशेष शिक्षकांची ४८६० पदे राखून ठेवण्यात आली असून यामध्ये समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत कार्यरत २९८४ विशेष शिक्षकांचे समायोजन करण्यात आलेले आहे.
(३) समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत उर्वरित कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत दि. ०४.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथील गंगापूर धरण प्रकल्पाच्या डावा कालवा बंदिस्त पाईपलाईनद्वारे प्रवाहित करण्याबाबत

(१३) ४२९३ (३०-०४-२०२५). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका हद्दीतील गंगापूर धरण प्रकल्पाचा नाशिक डावा कालवा एकूण कालवा लांबी ५१.५४० किमी पैकी कि.मी ७,००/०० ते कि.मी २५.००/०० इतका लांबीचा अंदाजे १८ कि.मी नाशिक शहरातून खुल्या स्वरूपाने प्रवाहित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कालवा नाशिक मनपा हद्दीतून पंचवटी प्रवाहित होत असल्याने त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा कचरा/घाण/ सांडपाणी इत्यादी कालव्यात सोडत असल्याने सदरील कालव्यावर एकूण शहरानजीकच्या १० गावाना अशुध्द पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा होवून तेथील नागरीकांच्या आरोग्य धोक्यात येत असून कालव्यालगत झोपडपट्टीतील लहान मुले व अनेक नागरिकांचे कालव्यात बुडून मृत्यू झाल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील कालवा मनपा हद्दीतून पंचवटी परिसरातून जात असल्याने पंचवटी परिसरात सिंहस्थ कुंभमेळा-२०२७ मध्ये पार पडत असल्याने सदरील खुल्या स्वरूपाचे प्रवाहित कालवा बंदिस्त करण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन जलसंपदा मंत्री व अपर मुख्य सचिव व प्रधान सचिव यांना सन २०२३ व सन २०२४ मध्ये वेळोवेळी पत्राव्दारे व जलसंपदा मंत्री व सचिव जलसंपदा विभाग यांना दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शहरातील नागरिकांच्या सुरक्षेच्या-दृष्टीने व नियोजित-२०२७ मधील सिंहस्थ कुंभमेळाच्या दृष्टीने सदरील खुला प्रवाहीत कालवा थेट बंदिस्त पाईपव्दारे प्रवाहित करणे अत्यंत गरजेचे असल्याचे अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र तसेच कार्यकारी संचालक,गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजी नगर यांनी अहवाल शासनाच्या जलसंपदा विभाग, मंत्रालय यांना सादर केला आहे ,हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी खुल्या कालव्यामध्ये भविष्यात लहान मुले, नागरिक तसेच सिंहस्थ कुंभमेळा -२०२७ मध्ये अपघात होऊन मोठया प्रमाणात जीवितहानी व वित्तहानी होऊ शकते असा अहवाल मनपा प्रशासन, व प्रशासन जलसंपदा विभाग नाशिक यांनी शासनास पाठविल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, कुंभमेळा व शहरातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला नाशिक मनपा हद्दीतील १८ कि.मी खुला कालवा थेट बंदिस्त पाईपव्दारे प्रवाहित करण्यासाठी प्रस्ताव क्र. संकीर्ण क्र.प्रमाप्र:२०२४/ (प्र.क्र.१६८/२४) सिंव्य (कामे) शासनाच्या जलसंपदा विभागाकडे प्रशासकीय मान्यता अभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०८-२०२५) :
(१) अंशत: खरे आहे.
नाशिक डावा तट कालवा कि.मी. ७/७२५ ते २३/५३० असा एकूण १५.८०५ कि.मी. नाशिक महानगरपालिका हद्दीतून जातो.
(२) अंशत: खरे आहे.
शहरीकरणामूळे नाशिक डावा कालव्यालगत झोपडपट्टी झालेल्या आहेत. कालव्यात मनपा हद्दीत मोठ्या प्रमाणात प्लास्टिक/कचरा/घाण/सांडपाणी इ. टाकण्यात येते. त्यामुळे आवर्तन काळात कालवा फुटीचा धोका उद्भवतो. तसेच यापूर्वी कालव्याच्या प्रवाहात लहान मुले व जनावरे बुडून दगावल्याच्या घटना घडलेल्या आहेत. सदरील कालव्यावर १० गावांचा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अवलंबून आहे.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधींनी यापूर्वी विविध पत्रान्वये नाशिक महानगरपालिका हद्दीतील गंगापूर धरणाचा नाशिक डावा तट कालवा बंद पाईपलाईनद्वारे बंदिस्त करणेबाबतची मागणी केलेली आहे.
तसेच दि. ०४ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पत्राद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर सदर कालवा बंदिस्त करणेबाबतची मागणी मा. मंत्री जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचेकडे केली आहे.
(४), (५) व (६) हे खरे आहे.
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून कि.मी. ११ ते १९ मधील बंदिस्त पाईपलाईन करणेच्या रू. ९५.२३ कोटी किंमतीच्या कामाचा सुधारित प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर शेरे उपस्थित केले आहेत. सदर शेरे पूर्तता अहवाल क्षेत्रिय स्तरावरून प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

गृहनिर्माण सोसायट्यांच्या नोंदणी व मालकी हक्क हस्तांतरणाबाबत

(१४) ४२९५ (२९-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांची संख्या किती आहे त्यापैकी किती सोसायट्यांना विकासकांमार्फत किंवा मानीव अभिहस्तांतरणा (deemed conveyance) जमिनीचे हस्तांतरण मिळाले आहे किंवा जमिनीचे हस्तांतरण (conveyance) मिळाले नाही,
(२) असल्यास, ज्या सोसायट्यांना अद्याप हस्तांतरण (conveyance) मिळाले नाही त्यांना मानीव

अभिहस्तांतरणद्वारे (deemed conveyance) जमिनीच्या मालकी हक्काची नोंदणी करण्यासाठी शासनामार्फत काणेती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच प्रकल्पग्रस्त पुनर्वसन योजना (PAP) अंतर्गत बांधलेल्या इमारतींमध्ये अनेक ठिकाणी गृहनिर्माण सोसायट्या नोंदणीकृत नाहीत अशा इमारतींमध्ये सोसायट्या स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, प्रकल्पग्रस्त पुनर्वसन योजना (PAP) इमारतींमध्ये गृहनिर्माण सोसायट्या नोंदणीकृत झाल्या आहेत, त्यांना नियोजन प्राधिकरणांकडून हस्तांतरण मिळत नाही, अशा प्रलंबित प्रकरणांबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबासाहेब पाटील (२२-०९-२०२५) : (१) अंशत: खरे आहे,

महाराष्ट्र राज्यात सहकार आयुक्त यांच्या अधिपत्याखाली एकूण ९ विभाग कार्यरत असून, सदर विभागात मिळूण एकूण १,२६,५४४ नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. त्यापैकी मानीव अभिहस्तांतरण झालेल्या संस्थाची संख्या २५,७५७ असून, अभिहस्तांतरण न झालेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या ९०,९४७ एवढी आहे. तसेच अभिहस्तांतरणाची आवश्यकता नसलेल्या संस्था ९,८४० इतक्या आहेत.

(२) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ व नियम १९६४ मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या अथवा अपार्टमेंटच्या जागा व इमारतीचे मानीव अभिहस्तांतरण विकासक/प्रवर्तक यांनी विहीत मुदतीत करुन देण्याची तरतूद आहे. त्याकरिता गृहनिर्माण विभागाच्या दि.२५/०२/२०११ रोजीच्या अधिसूचनेव्दारे सक्षम प्राधिकारी म्हणून जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मानीव अभिहस्तांतरणाच्या प्रक्रियेचे सुलभिकरण करणेसाठी या विभागाच्या दिनांक २२/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्व समावेशक सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच सहकार आयुक्त कार्यालयाच्या दि. ०४/०४/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये, सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी होत असतानाच, मानीव अभिहस्तांतरणासाठी कागदपत्रांची पूर्तता संबंधीत प्रवर्तकांकडून करुन घेवून सक्षम प्राधिका-याकडे मानीव अभिहस्तांरणाचे प्रस्ताव सादर करणेबाबत सहकारी गृहनिर्माण संस्थांना सूचना देण्यात आल्या आहे.

सहकार आयुक्तांच्या दि.२४.०३.२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार, मानीव अभिहस्तांतरण प्रस्ताव सादरीकरणासंदर्भात जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून मार्गदर्शनपर मेळावे / चर्चासत्रे आयोजित करण्यात येतात. त्याचप्रमाणे सहकार आयुक्तांच्या दि. २२.०५.२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार, शासनाच्या ई-गव्हर्नन्स धोरणांतर्गत नागरीकांच्या सोईसाठी जलद गतीने तसेच पारदर्शक पध्दतीने अर्धन्यायीक निर्णय प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने मिळविण्यासाठी "प्रत्यय" ही ऑनलाईन कार्यप्रणाली विकसित करण्यात आली असून, सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये मानीव अभिहस्तांतरण प्रक्रियेचा समावेश करण्यात आला आहे.

(३) सार्वजनिक हिताच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या अंमलबजावणीमुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पबाधित व्यक्तींसाठी सदनिका निर्माण करुन वितरीत करण्याबाबतचे धोरण गृहनिर्माण विभागाने दि.१९.०८.२०२४ रोजी जाहीर केले आहे. त्यानुसार प्रकल्पग्रस्त सदनिका धारकांनी गृहनिर्माण संस्थेचे सभासद होण्यासाठी अर्ज केल्यानंतर, संबंधित प्राधिकरणाने (बृहन्मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुरर्वसन प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, इ.) गृहनिर्माण संस्था नोंदणी करण्याकरीता परिपूर्ण प्रस्ताव निबंधक कार्यालयास सादर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(४) प्रकल्पबाधित व्यक्तीच्या (PAP) नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना मालमत्तेच्या हस्तांतरणाबाबत

संबंधित प्राधिकरणाकडून (बृहन्मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, इ.) कार्यवाही होणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात येणार असल्याबाबत

(१५) ४३३६ (३०-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पावसाचे पाणी समुद्रात वाहून वाया जात असून वाया जाणारे पाणी साठविण्यासाठी नवीन पर्यायाचा विचार शासन करणार असून त्याकरिता एक समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणात मोठया प्रमाणात पाऊस पडत असून भौगोलिक परिस्थितीमुळे हे गोडे व पिण्यायोग्य पाणी पश्चिमवाहिनी नद्यांमधुन समुद्रात वाहून जाते याकरिता कोयना जलविद्युत, भंडारदरा इत्यादी जलाशयांच्या उर्ध्व बाजूला असलेल्या गावांना देखील जलाशयातील पाणी पातळी कमी झाल्याने पाण्याची टंचाई जाणवत आहे याकरिता पाण्याचे नियोजन करुन पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता बंधारे बांधण्यात यावेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने पावसाचे पाणी साठवून ठेवण्याकरीता समिती स्थापन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-०८-२०२५) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) अंशत: खरे आहे.
कोयना जलविद्युत प्रकल्प व भंडारदरा प्रकल्प यासारख्या राज्यातील धरणांच्या जलाशयाच्या वरील भागातील गावांमध्ये वर्षाच्या शेवटी व ऐन उन्हाळयांच्यावेळी पिण्याच्या पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. सदर गावांना जलाशयाच्या वरील भागात बुडीत बंधारे/बंधाऱ्यांची शृंखला बांधुन वर्षाच्या शेवटी व ऐन उन्हाळयांच्यावेळी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देता येईल का? यानुषंगाने अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी जलसंपदा विभाग शासन निर्णय, क्रमांक. बैठक-२०१९/(३३०/२०२९)/लपा, दि.२२/०१/ २०२५ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

करमाळा (जि. सोलापूर) येथील सिना माढा उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी निधीची तरतूद करण्याबाबत

(१६) ४३५८ (२८-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.अभिजीत पाटील (माढा) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि. सोलापूर) येथील सिना माढा उपसा सिंचन योजनेचा जवळपास रुपये ६२३.६ कोटी रकमेपैकी ६१५.८९ कोटी इतका निधी खर्च झाला असून प्रकल्पासाठी संपादित केलेल्या खाजगी जमिनधारक शेतकऱ्यांचे भूसंपादनाचे जवळपास १२ कोटी देणे शिल्लक आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या द्वितीय सुप्रमा-पैकी जवळपास रुपये ६१५.८९ कोटी इतका खर्च झाला असताना अजूनही जवळपास रु. ६.१६ कोटी रु.इतक्या किंमतीची सिंचन निर्मितीची कामे अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे जवळपास रु. २० कोटी. इतक्या निधीची तरतूद करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी सदर प्रकल्पाला तातडीने निधी उपलब्ध करून देऊन तसेच उर्वरित कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

सीना माढा उपसा सिंचन योजना, ता.माढा, जि.सोलापूर या प्रकल्पास रू.६२३.०६ कोटी इतकी रकमेस द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून, प्रकल्पावर मार्च, २०२५ अखेर सुमारे रू.६२१.७५ कोटी इतका खर्च झाला आहे. त्यापैकी भूसंपादनावरील खर्च रू.१५३.४४ कोटी इतका असून प्रस्तावित तृतीय सुप्रमानुसार भूसंपादनासाठी अद्यापही रू.११०.५१ कोटी निधीची आवश्यकता आहे.

प्रकल्पाच्या प्रस्तावित तृतीय सुप्रमानुसार उर्वरीत कामाची किंमत रू.४४९.४० कोटी इतकी आहे. यामध्ये रू.३३८.८९ कोटी बांधकामासाठी तरतुद करण्यात आली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.०३/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये रू.१५ कोटी निधीची मागणी केली आहे.

(४) सन २०२५-२६ च्या आर्थिक वर्षात सीना माढा प्रकल्पासाठी रू.२० कोटी इतक्या निधीची तरतुद केली आहे. प्रकल्पाअंतर्गत उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवाल महामंडळाकडून राज्य तांत्रिक सल्लागार समिती २ पुणे यांना सादर करण्यात आला असून, पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

सीना माढा उपसा सिंचन योजना प्रकल्प पाच वर्षात निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

करमाळा (जि. सोलापूर) तालुक्यातील नियोजित रीटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाबाबत

(१७) ४३५९ (३०-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि. सोलापूर) तालुक्यातील कुकडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात नियोजित रिटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाकरिता WAPCOS या त्रयस्थ संस्थेची नियुक्ती केली असून त्या मार्फत कुकडी प्रकल्पाचे फेरजलनियोजन व योजनेच्या सविस्तर सर्वेक्षणाकरिता कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांनी रु ५० लक्ष इतक्या निधीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुकडी प्रकल्पातून ५.५ टीएमसी पाणी आरक्षित असतानाही १०% सुद्धा पाणी मिळत नसल्याने ४५ गावातील जवळपास २४ हजार ५६२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याकरिता नियोजित रीटेवाडी उपसा सिंचन योजना राबविणे अत्यंतगरजेचे आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नियोजित रीटेवाडी उपसा सिंचन योजनेद्वारा तालुक्यातील किती क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे,
(४) असल्यास, नियोजित रीटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाकरिता नियुक्त संस्थेला प्रकल्पाच्या सविस्तर

सर्वेक्षणाची मंजुरी देत आवश्यक असलेला रु. लक्ष निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) :
(१) अंशत: खरे आहे.
रिटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाकरीता WAPCOS या संस्थेची नियुक्ती केलेली नसून, कुकडी प्रकल्पाचा फेर जलनियोजनाचा अभ्यास WAPCOS या केंद्र शासनाच्या त्रयस्थ संस्थेकडून करून घेण्यास व रू.३.२१ कोटी इतकी सल्ला मसलत फी संस्थेस अदा करण्यास तत्वत: मान्यता प्रदान केली आहे.
(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.
कुकडी प्रकल्पाअंतर्गत करमाळा तालुक्यातील प्रकल्पीय सिंचन क्षेत्र २४५६२ हे. आहे. त्यापैकी २३७०५ हे. क्षेत्राची सिंचन निर्मिती झालेली आहे. कुकडी प्रकल्पाचा एकुण पाणीवापर ३३.३३ टी.एम.सी तर करमाळा तालुक्यातील क्षेत्राला ५.२८ टी.एम.सी. इतके पाणी कुकडी डाव्या कालव्याच्या मुखाशी सोडणे अपेक्षित आहे. करमाळा तालुकयातील लाभक्षेत्र हे कुकडी डाव्या कालव्याच्या कि.मी.२२३ ते २४९ या अंतीम भागात असल्याने इतक्या दुरवर पाणी पोहोचवण्यात मोठ्या प्रमाणात वहनव्यय होतो. प्रत्यक्षातील वहनव्यय जास्त असल्याने पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. कुकडी प्रकल्पातील करमाळा तालुक्याचे पाणी कुकडी डाव्या कालव्याऐवजी रिटेवाडी उपसा सिंचन योजनेद्वारे देण्याची मागणी आहे.
नियोजित रिटेवाडी उपसा सिंचन योजनेद्वारे करमाळा तालुक्यातील २४५६२ हे. क्षेत्रास पाणी उपलब्ध करून देणेबाबत सविस्तर सर्वेक्षणाअंती निश्चित होईल.
(४) रिटेवाडी उपसा सिंचन योजनेचा समावेश असलेल्या नियोजित कुकडी उजनी उपसा सिंचन योजनेच्या सविस्तर सर्वेक्षणास सुमारे रु.४७ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. WAPCOS संस्थेचा कुकडी प्रकल्पाचा फेर जलनियोजनाचा अंतिम अहवाल महामंडळास प्राप्त झाला असून सदर प्रकरणी पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

बिताका पश्चिम घाट पाणी वळण (जि.अहिल्यानगर) योजनेला मंजुरी देण्याबाबत

(१८) ४४४९ (०१-०५-२०२५). डॉ.किरण लहामटे (अकोले) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर जिल्हयातील बिताका पश्चिम घाट पाणी वळण योजनेला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार व मा.उपमुख्यमंत्री यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास दृकश्राव्य माध्यमाद्वारे घेतलेल्या बैठकीप्रमाणे जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांनी शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची लेखी निवेदने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०२३ पासून मा.उपमुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) : (१) होय

(२) होय

(३) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याची सुचना क्षेत्रिय कार्यालयास देण्यात आली असून क्षेत्रिय कार्यालय तपासणी करित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे मेळावणे (शिसवद) (ता.अकोला, जि.अहिल्यानगर) येथील अप्पर आंबीत/बेलकडा धरणाच्या मंजुरीबाबत

(१९) ४४५४ (३०-०४-२०२५). डॉ.किरण लहामटे (अकोले) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मेळावणे (शिसवद) (ता.अकोला, जि.अहिल्यानगर येथील अप्पर आंबीत/बेलकेडा धरणास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी महसूल मंत्री यांचेकडे दिनांक ११ मे, २०२२ रोजी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने प्रादेशिक कार्यालयातून संदर्भीय पत्रान्वये दिनांक ०१ ऑगस्ट, २०२२ रोजी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची लेखी निवेदने स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२२ पासून मा. उपमुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०८-२०२५) : (१) होय हे खरे आहे.

(२) होय खरे आहे.

(३) मौजे मेळावणे (शिसवद) ता. अकोले येथे अप्पर आंबीत धरणास मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालयाचे पत्र दि.३०.०८.२०२३ अन्वये शासनास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर शासन पत्र दि.२२.०३.२०२४ अन्वये पुढील प्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.

“मेळावणे (शिसवद) ता. अकोले किंवा अप्पर अंबित / बेलकडा धरण प्रकल्प, मुळा प्रकल्पाच्या चल साठ्यात गाळ साठल्याने उपलब्ध होणाऱ्या जलनिष्पत्तीतून प्रस्तावित केलेला आहे. राज्यातील मोठ्या पाटबंधारे प्रकल्पातील गाळ व गाळमिश्रित वाळू निष्कासनाबाबत धोरण निश्चित करणेची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे. यामुळे नविन योजनेस मंजूरी देऊन नविन जलसाठा निर्माण न करता गाळ / गाळमिश्रित वाळू निष्कसनाचे धोरण निश्चित झाल्यावर मुळा धरणातील गाळ निष्कासन केल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे फेरनियोजन करून त्यानुसार पाणी उपलब्धता व आर्थिक, तांत्रिक व्यवहार्यता तपासून नवीन प्रकल्प प्रस्तावित करण्यात यावा.”

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) येथे प्राथमिक शिक्षक समितीच्या विविध मागण्यांसंदर्भात

(२०) ४५२१ (०५-०५-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ तालुक्यातील (जि.सिंधुदूर्ग) महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने कुडाळ पंचायत समितीद्वारे विदयार्थ्यांकरिता तात्काळ गणवेश मिळणे, संच मान्यता जाचक आदेश रद्द करणे , तसेच ऑनलाईन सुविधा शाळांना पुरवल्याशिवाय कामाची सक्ती करु नये अशा विविध मागण्यांसाठी लाक्षणिक धरणे आदोलन माहे डिसेंबर, २०२४ मध्ये करण्यात आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात विद्यार्थ्यांसह शिक्षकांवर देखील अन्याय होऊ नये, यासाठी सहायक गटविकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (०४-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) विद्यार्थ्यांना विहित कालावधीत गणवेश मिळण्यासाठी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून शाळा व्यवस्थापन समितीव्दारे गणवेशाचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार कुडाळ तालुक्यातील एकूण ६३६६ लाभार्थी शाळातील विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ देण्यात आला आहे.

संचमान्यतेबाबतचे यापूर्वीचे निकष दि.१५ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे अधिक्रमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयामध्ये दि.१९ सप्टेंबर, २०२४ व दि.०९ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. दि.१५ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील निकषानुसार आधार प्रमाणित विद्यार्थी संख्या विचारात घेवून प्रथमच सन २०२४-२५ च्या संचमान्यता करण्यात आल्या आहेत.

सन २०२४-२५ मध्ये कुडाळ तालुक्यातील ५ शाळांना ऑनलाईन सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.
४) प्रश्न उद्‌भवत नाही.

दहावी परीक्षेतील बनावट प्रमाणपत्राद्वारे गुण मिळविण्याच्या प्रकरणाची चौकशी व संबंधित दोषींवरील कारवाईबाबत

(२१) ४५३२ (०५-०५-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहावीच्या परिक्षेत केवळ पाचशे रुपये दया आणि प्रमाणपत्र घेऊन दहा गुण मिळवा अशा बोगस मार्कांचे सत्र मोठया प्रमाणात सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्याच्यादृष्टिने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२९-०८-२०२५) :(१) हे खरे नाही.
यानुषंगाने विद्यार्थी/पालक/मुख्याध्यापक यांच्या कडून कोणतीही तक्रार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , पुणे यांच्या कार्यालयात प्राप्त झालेली आढळून येत नाही.
(२) शास्त्रीय कला,लोककला व चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी च्या परीक्षांमध्ये अतिरिक्त गुण देण्यात येत असतात. शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २४ नोव्हेंबर २०१७ च्या

शासन निर्णयामध्ये यानुषंगाने सूचना,अटी व शर्ती नमूद केल्या आहेत. तसेच असे अतिरिक्त गुण देत असताना सांस्कृतिक कार्य विभागाच्या समन्वयाने प्राप्त प्रस्तावांची छानणी करुनच अशा संस्थांना मान्यता देण्यात येत असते व अश्या मान्यता प्राप्त संस्थांच्या विद्यार्थ्यांनाच असे गुण ग्राह्य असतात.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सोलापूरमध्ये शासकीय इंजिनिअरींग कॉलेज सुरु करण्याबाबत

(२२) ४६८७ (०५-०५-२०२५). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथे शासकीय डिप्लोमा कॉलेज हे सन १९६० मध्ये सुरु झाले असून त्याच वर्षी शासकीय इंजिनिअरिंग कॉलेज सुरु होणे अपेक्षित होते परंतु अद्यापपर्यंत सुरु होऊ शकलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या ५ ते ६ वर्षांमध्ये नागपूर, यवतमाळ, रत्नागिरी व कोल्हापूर मध्ये शासकीय इंजिनिअरिंग कॉलेज सुरु झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर शहरातसुद्धा इंजिनिअरिंग कॉलेज सुरु करण्याबाबत मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सोलापूर येथील शासकीय डिप्लोमा कॉलेजमध्येच शासकीय इंजिनिअरिंग कॉलेज लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२६-०८-२०२५) : (१) अंशतः खरे आहे.
शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर हे सन १९५६ मध्ये सुरू झालेले आहे. त्यावेळी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होणे अपेक्षित नव्हते तर केवळ शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली होती.
(२) होय, हे खरे आहे.
नागपूर येथे सन २०१६, रत्नागिरी येथे सन २०२१ आणि कोल्हापूर येथे सन २०२३ मध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू झालेली आहेत. यवतमाळ येथे जुने शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतनाचे श्रेणीवर्धन करुन सन २०१८मध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाले आहे.
शासन पत्र दि.१३ मार्च, २०२३ अन्वयें शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पुढे धुळे, जालना, सोलापूर व लातूर येथील शासकीय तंत्रनिकेतने आहेत तशीच चालू ठेवणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार सोलापूर येथील तंत्रनिकेतनात पदविका अभ्यासक्रम सुरू आहे.
(३) व (४) सोलापुर येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याबाबत संचालक,तंत्रशिक्षण यांनी दि.१०.०३.२०२५ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

सातारा जिल्हयातील वांग-मराठवाडी धरणबाधित गावांतील पुनर्वसित वसाहतीसाठी स्वतंत्र ग्रामपंचायतीची मागणी होत असल्याबाबत

(२३) ४७७१ (२९-०४-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील वांग (मराठवाडी) धरणबाधित चार गावांतील ७११ कुटुंबांचे तालुक्यातील सहा गावात पुनर्वसन झाले परंतू शासनाकडून अद्यापही येथे मुलभूत व पायाभूत सुविधा मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही वर्षात पुनर्वसित वसाहतीसाठी स्वतंत्र ग्रामपंचायतींचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत तसेच उक्त वसाहती या पायाभूत, मूलभूत सुविधांपासून वंचित राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त पुनर्वसित वसाहतीमध्ये पिण्याचे पाणी, पक्के रस्ते, गटारे आदी सुविधा तसेच प्रत्येक कुंटुंबातील एकाला शासकीय नोकरी व व्यवसायासाठी अनुदान देण्याबाबतचे आश्वासन शासनाने दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०८-२०२५) :
(१) हे अंशतः खरे आहे.
सातारा जिल्ह्यातील वांग (मराठवाडी) धरणामधील चार गावातील बाधित लोकांचे पुनर्वसन हे सातारा जिल्ह्यातील मौजे कोळे, घारेवाडी, ताईगडेवाडी, उमरकांचन, मेंढ व निनाईनगर तसेच सांगली जिल्ह्यातील शाळगाव, विहापुर, तोंडोली, नेवरी, कोतीज, शिवाजीनगर, कळंबी, कार्वे, माहुली, आळसंद व बामणी येथे करण्यात आलेले आहे. सांगली जिल्ह्यातील पुनर्वसित गावांना सर्व मूलभूत नागरी सुविधा पुरवणेत आलेल्या असून सातारा जिल्ह्यातील २ गावठाणातील एकूण ५ नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.
सदर पुनर्वसन वसाहतींना अद्याप महसुली गावाचा दर्जा प्राप्त नसल्याने या पुनर्वसित वसाहतींसाठी नवीन ग्राम पंचायतीची स्थापना करता येत नाही. तसेच पुनर्वसित वसाहतीसाठी स्वतंत्र ग्रामपंचायतीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित नाही.
सातारा जिल्ह्यातील ६ पुनर्वसन गावठाणापैकी ४ गावठाणातील मूलभूत नागरी सुविधा पूर्ण असून त्या ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण करणेची प्रक्रिया प्रगती पथावर आहे. उर्वरित २ गावठाणातील ५ नागरी सुविधांची कामे अपूर्ण आहेत. तसेच सांगली जिल्ह्यातील ११ गावठाणातील नागरी सुविधांची कामे पुर्ण करुन जिल्हा परिषद सांगली यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
मुक्त पुनर्वसित वसाहतीमध्ये पिण्याचे पाणी एक पोहोच रस्ता व अंतर्गत रस्ते बांधिव आरसीसी गटारे या जलसंपदा विभागामार्फत पूर्ण करणेत आलेल्या आहेत तसेच प्रत्येक कुटुंबातील एकाला शासकीय नोकरी व व्यवसायासाठी अनुदान देणे बाबतचे आश्वासन देण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

सहकार निवडणूक प्राधिकरणास निवडणूक आयोगाचा दर्जा देण्याबाबत

(२४) ४७९० (०५-०५-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लाखो सहकारी संस्थांच्या निवडणुका स्वतंत्रपणे घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सहकार निवडणूक प्राधिकरणास निवडणूक आयोगाचा दर्जा देण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहकारी संस्थांच्या निवडणुकांमध्ये पारदर्शकता असणे, निवडणूक खर्च, व्यवस्थापनासाठी नियम आणि तरतुदी तसेच योग्यतेची खात्री होण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, निवडणूक प्रक्रियेतील तक्रारी आणि अपीलांसाठी प्राधिकरण किंवा यंत्रणा राबविण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबासाहेब पाटील (१०-०७-२०२५) :
(१) अंशत: खरे आहे. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ व निवडणूक नियमांमधील सुधारणा सुचविण्यासाठी गठीत केलेल्या स्थायी समितीने दि. २३.११.२०२३ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावात राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण या नावामध्ये प्राधिकरण ऐवजी आयोग असे संबोधण्याबाबत प्रस्तावित केले आहे.
(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ कब नुसार स्थापन केलेल्या निवडणूक प्राधिकरणावर सहकारी संस्थांच्या निवडणूकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण करण्याची जबाबदारी सोपवलेली आहे. त्यानुसार कायदा व नियमातील तरतुदी तसेच प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रकीय सुचना व आदेशांनुसार देखरेख ठेवण्याचे कामकाज करण्यात येते.
(३) निवडणूक प्रक्रियेसंदर्भात प्राधिकरणाचे अखत्यारितील प्राप्त तक्रारीवर प्राधिकरणाकडून आवश्यकतेप्रमाणे कार्यवाही केली जाते. तथापि प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेबाबत काही वाद निर्माण झाल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७८ अन्वये मा. सहकार न्यायालयात दाद मागण्याची तरतुद आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कृष्णा कॅनॉलमधून बारमाही पाणीपुरवठा करण्याबाबत

(२५) ४८८७ (०१-०५-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराडजवळील (जि.सातारा) खोशीपासून नांद्र (ता.पलुस) गावापर्यंत जाणारा कृष्णा नदीवरील कृष्णा कॅनॉल मधून कराड,वाळवा व पलूस येथील गावांना शेतीसाठी पाणी पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कॅनॉलमधून उन्हाळयात कमी पाणीपुरवठा होत असल्याने परिणामी शेतीचे नुकसान होत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या कॅनॉल नंतर तयार झालेले खानापूर व कडेगाव तालुक्यात तसेच आटपाडी तालुक्यात जाणारे पाणी कृष्णा नदीतून पाणी उचलले जाते हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कृष्णा कॅनॉलमधून बारमाही पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) :

(१) होय.

(२) नाही.

(३) खोडशी बंधाऱ्याच्या खालील बाजूस टेंभू गावाजवळ टेंभू उपसा सिंचन ही स्वतंत्र योजना असून, या योजनेच्या बराजमधून सातारा जिल्ह्यातील कराड, सांगली जिल्ह्यातील कडेगांव, खानापूर, तासगांव, आटपाडी व कवठेमहांकाळ तसेच सोलापूर जिल्ह्यातील सांगोला करीता पाणी उचलण्यात येऊन सदर तालुक्यामधील क्षेत्रास पाणी देण्यात येते.

(४) कृष्णा कालव्यामध्ये पाणी हे खोडशी बंधाऱ्याच्या मुक्त पाणलोट क्षेत्रातुन तसेच धोम व कण्हेर प्रकल्पाच्या समादेश क्षेत्रातुन निर्माण होणाऱ्या पुर्नउद्भवातून उपलब्ध होते व त्याप्रमाणे दरवर्षी खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात वापर केला जातो. तसेच कृष्णा कालव्यातून पुर्ण क्षमतेने पाणी वहनासाठी अस्तरीकरणाची कामे प्रस्तावित आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील औषध निर्माणशास्त्र पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयात जागा रिक्त असल्याबाबत

(२६) ४९०० (०५-०५-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औषध निर्माणशास्त्र पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयात शेकडो जागा रिक्त असल्याने एकही नवीन महाविद्यालय यंदाच्या शैक्षणिक वर्षात सुरु केले जाणार नसल्याची भूमिका तंत्रशिक्षण संचालनालयाने घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०३० पर्यंत राज्यातील नवीन महाविद्यालयांसाठीचा आराखडा ठरविण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ११ तज्ञ सदस्यांची समिती गठीत केली असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीने अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्यानुसार अहवालातील शिफारशी लागू करण्याबाबत सक्षम प्रणाली तयार करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१२-०९-२०२५) : (१), (२) व (३) औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या रिक्त राहणाऱ्या जागा विचारात घेऊन, शैक्षणिक वर्ष २०२५-३१ पर्यंत औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखांच्या अभ्यासक्रमांबाबत धोरण ठरविण्यासाठी बृहत आराखडा तयार करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाने दि.१५.०३.२०२४ रोजीच्या आदेशान्वये ११ तज्ञ सदस्यांची समिती गठित केली होती.

सदर समितीने सादर केलेल्या शिफारशीस अनुसरुन, राज्यातील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये झालेली वाढ विचारात घेऊन २०२५ ते २०३१ या पुढील पाच वर्षात नवीन संस्थांना परवानगी देण्यात येऊ नये, तसेच औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यात येऊ नये अशी विनंती आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग, भारत सरकार तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईसह राज्यभरात शाळेच्या बसेस मध्ये शुल्कवाढ झाल्याबाबत

(२७) ५०१३ (०५-०५-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यभरात शाळेच्या बसेस मध्ये १५ ते १८ टक्के शुल्कवाढ करण्याचा निर्णय माहे एप्रिल पासून स्कूल ऑफ ओनर्स असोसिएशनने घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेच्या बसेस मध्ये शुल्कवाढ झाल्याने सर्वसामान्य जनतेच्या मनात प्रचंड असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (३०-०९-२०२५) : (१) हे खरे नाही, सदर प्रकरणी कोणतीही तक्रार अथवा असोसिएशनचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुळशी व कोयना प्रकल्पाद्वारे जलविद्युत निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातील पश्चिमेकडील वळविलेले पाणी पूर्वेकडे वळविण्याबाबत

(२८) ५११७ (२९-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलविद्युत निर्मितीसाठी मुळशी व कोयना प्रकल्पाद्वारे कृष्णा खोऱ्यातील नैसर्गिकरित्या पूर्वमुखी नद्यांचे कृत्रिमपणे पश्चिमेकडील विपुलतेच्या खोऱ्यात वळविलेले पाणी पूर्वेकडे तुटीच्या खोऱ्यात वळविण्याबाबत समिती स्थापन करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी भावे समितीचा अहवाल सादर करण्यात आला असून, सुर्वे समितीचा अहवाल अद्याप सादर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सुर्वे समितीचा अहवाल सादर करून पाणी वळविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.२४/०३/२०२५ रोजी मुळशी व कोयना प्रकल्प तसेच नद्यांच्या प्रवाह सुर्वे समितीच्या अहवालावर चर्चा करणेचे अनुषंगाने आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीच्या मंजूर इतिवृत्तातील निर्देशांच्या अनुषंगाने मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१/०५/२०२५ रोजी टाटा पॉवर, महापारेषण व महाजेनको व्यवस्थापनासोबत आढावा बैठक संपन्न झाली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सुत गिरण्या पूर्ववत होण्याकरिता अनुदान जाहिर करणेबाबत

(२९) ५१४१ (२९-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) येथील सूत गिरण्यांना कोरोनाच्या काळात मोठा फटका बसल्याने सुत गिरण्यांची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सुत गिरण्या पूर्ववत होण्याकरिता शासनाने किती अनुदान जाहिर केले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे,

श्री. संजय सावकारे (२१-०८-२०२५) :

(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) १. सहकारी सूतगिरण्या सुरळीत चालाव्यात व आर्थिक अडचणीतून पुर्ववत होण्याकरीता प्रति चाती रु. ३०००/- याप्रमाणे वित्तीय संस्था / रा.स.वि.नि. कडून सूतगिरणी स्तरावर ५ वर्ष मुदती साठी घेतलेल्या कर्जावर ५ वर्षाचे कमाल १२ टक्के पर्यंतचे व्याज शासन भरेल अशी योजना शासन निर्णय दिनांक ११/०१/२०१७ अन्वये लागू करण्यात आली होती. तसेच, शासन निर्णय दिनांक १७/११/२०२३ अन्वये सहकारी सूतगिरण्यांनी वित्तीय संस्थांकडून /राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून प्रति चाती रूपये ५०००/- प्रमाणे २+५= ७ (२ वर्ष मोरॅटरीयम कालावधी) वर्षासाठी घेणाऱ्या मध्यम मुदत कर्जावर कमाल १२% पर्यंतचे व्याज प्रदान करण्याची योजना लागू केलेली आहे.

२. शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर, २०१८ अन्वये सहकारी सूतगिरण्यांकरीता प्रति युनिट रूपये ३/- प्रमाणे वीजदर सवलत योजना सुरू आहे.

(३) उपरोक्त प्रमाणे योजना लागू केलेल्या आहेत.

कांद्री (जि.भंडारा) येथील संत गजानन महाराज प्रशासकीय महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर झालेल्या गैरव्यवस्थापनाबाबत

(३०) ५२३९ (०५-०५-२०२५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील कवी कालिदास विद्यापीठ, रामटेक अंतर्गत कांद्री येथील संत गजानन महाराज प्रशासकीय महाविद्यालयातील हिवाळी परिक्षेच्या केंद्रावर एम.ए प्रथम वर्षात शिकणाऱ्या दोन विद्यार्थीनींनाच पर्यवेक्षक म्हणून केंद्रप्रमुखाने नियुक्त केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निर्देशनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परीक्षा केंद्रावरील बीए प्रथम वर्षाच्या हिवाळी परीक्षेत २२ विदयार्थ्यांनी अखेरचा पेपर सोडविण्यासाठी मोबाईलचा वापर केल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलाबांची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) २१ विद्यार्थी मोबाईलच्या मदतीने पेपर सोडवीत असल्याचे भरारी पथकाच्या निदर्शनास आले.

(३) सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विद्यापीठाने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम, १९९७ मधील कलम ३० (६) (अ) अन्वये गैरव्यवहार निवारण समिती गठीत केली. समितीच्या शिफारशींवर विश्वविद्यालयाने पुढीलप्रमाणे कार्यवाही केली.

१) विश्वविद्यालयाने सदर महाविद्यालय परीक्षा केंद्र म्हणून ३ वर्षाकरीता रद्द केले.

२) २१ विद्यार्थ्यांचे त्या दिवशी बी.ए. सिव्हील सर्विसेस प्रथम सत्र NEP योगा ॲण्ड लाईफ सायन्स या विषयाची संपूर्ण गूण संपादणूक रद्द केली आहे.

३) सदर महाविद्यालयाला रू. १,००,०००/- इतका दंड आकारला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

ब्रम्हापूरी (जि. चंद्रपूर) तालुक्यातील अडयाळ व गांगलवाडी उपसा सिंचन योजनेस मंजूरी मिळण्याबाबत

(३१) ५२४५ (२९-०४-२०२५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हापूरी (जि. चंद्रपूर) तालुक्यातील गोसीखुर्द प्रकल्पाचा भाग असलेल्या मेंडकी व अडयाळ उपसा सिंचन योजनेचा प्रस्ताव अंतिम प्रशासकीय मान्यतेअभावी कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांच्याकडे अनेक महिन्यापासून प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही उपसा सिंचनामुळे ब्रम्हपूरी तालुक्यातील टेलवर असलेल्या किमान ३० ते ३५ गावातील शेतींना सिंचनाची सोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही उपसा सिंचन योजनेस निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२५) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सुप्रमा प्रस्ताव मंत्रीमंडळ बैठकीसाठी सादर करण्यात आला होता. अड्याळ व मेंडकी उपसा सिंचन योजनांचा समावेश गोसीखुर्द प्रकल्पाचे प्रस्तावित चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यतेमध्ये करण्यात आला असून, दि.२२.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा. मंत्रिमंडळाची मान्यता मिळालेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मेंडकी उपसा सिंचन योजनेमध्ये ब्रम्हपुरी तालुक्यातील १४ व नागभिड तालुक्यातील ०४ तसेच अड्याळ उपसा सिंचन योजनेमध्ये ब्रम्हपुरी तालुक्यातील ०५ व नागभिड तालुक्यातील २२ असे एकूण ब्रम्हपुरी तालुक्यातील १९ व नागभिड तालुक्यातील २६ गावांना सिंचनाची सोय होणार आहे.

(३) ब्रम्हपुरी, (जि. चंद्रपूर) तालुक्यातील गोसीखुर्द प्रकल्पाचा भाग असलेल्या मेंडकी व अड्याळ उपसा सिंचन योजनेचा अंतर्भाव असून, दि. २२.०५.२०२५ च्या शासन निर्णयान्वये चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा. मंत्रिमंडळाची मान्यता मिळालेली आहे. सन २०२५-२६ मधील प्रकल्पास प्राप्त निधीमधून सदर कामे हाती घेण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील बाहययंत्रणाद्वारे (एजंसी मार्फत) होणारी पदभरती रद्द करणेबाबत

(३२) ५३६३ (२८-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील बाह्ययंत्रणेद्वारे करण्यात येत असलेली पदभरती रद्द करण्याबाबत महाराष्ट्र राज्य आय टी आय निदेशक संघ, सोलापूर या संघटनेने मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक ११ जानेवारी,२०२५ रोजी वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३)असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. मंगलप्रभात लोढा (३०-०६-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) व ३) अ) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या दिनांक ०७ एप्रिल, २०२२ रोजीच्या विभागाच्या सुधारित आकृतीबंधानुसार बाह्यस्त्रोताव्दारे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

ब) बाह्ययंत्रणेव्दारे भरावयाच्या सेवांमध्ये तासिका तत्वावरील निदेशकांच्या सेवा संरक्षित केल्या आहेत. विभाग निहाय ६ एजन्सीव्दारे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याद्वारे करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विमला गोयंका इंग्लिश मिडीयम स्कूल, (जि.कोल्हापूर) येथील १२वी परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या हॉल तिकीटाच्या त्रुटींबाबत

(३३) ५४६६ (०५-०५-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील विमला गोयंका इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्यु.कॉलेज मध्ये १२वी च्या परिक्षेला बसलेल्या १०० विद्यार्थीच्या हॉल तिकीटामध्ये चुकीची माहिती भरणे, फोटो चुकीचे लावणे, हॉल तिकीट विद्यार्थ्यांना न मिळणे इ. गंभीर प्रकार झाल्याची बाब दिनांक ८ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज पुन्हा भरुन घेण्याचे कोल्हापूर विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोर्डाने या सर्व प्रकरणाची चौकशी शाळा व्यवस्थापनाकडे केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२९-०८-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.

ज्या विद्यार्थ्यांचे विषय व माहीती चुकीची भरण्यात आली होती, त्यांना कालमर्यादेत योग्य बदल करुन देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या चुकीच्या फोटो संदर्भात विभागीय मंडळ कोल्हापूर यांच्या कार्यालयाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) विमल गोयंका कनिष्ठ महाविद्यालयाने प्रवेशपत्राबाबतची कार्यवाही गांभीर्याने केली नसल्यामुळे याविषयी महाविद्यालयाकडून खुलासा मागविण्यात आला आहे. तसेच या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता सदर कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळ मान्यता व सांकेतीक क्रमांक रद्द का करण्यात येऊ नये याविषयी कारणे दाखव नोटीस देण्यात आली आहे.

(४) या प्रकरणी चौकशी करण्यात येत आहे.

राज्याच्या जल पर्यटन धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत

(३४) ५८४९ (३०-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या जल पर्यटन धोरणानुसार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने खासगी व्यावसायिकांना लीजवर दिलेल्या १५ जमिनीपैकी केवळ ६ जमीनीवर सद्यस्थितीत जल पर्यटन सुरू असल्याचे दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्याचे जल पर्यटन धोरणाची अंमलबजावणी न करणाऱ्या विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (१८-०६-२०२५) :(१) होय, अंशत: खरे आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत पर्यटन विकासाकरीता १५ प्रकल्पांपैकी १२ प्रकल्पांवर खाजगी विकासकास व एका प्रकल्पावर महसूल विभागास काही जमिन लीज वर देण्यात आली आहे. खाजगी विकासकास लीजवर दिलेल्या जमिनीपैकी ५ प्रकल्पांवर पर्यटन सुरु आहे. पर्यटकांचा प्रतिसाद नसल्याने एका प्रकल्पावरील पर्यटन बंद आहे. महसूल विभागास लीज वर दिलेल्या एका प्रकल्पावर पर्यटन विकासाची कामे प्रगतीपथावर आहेत. ३ प्रकल्पांवर जमिनीच्या अडचणीमुळे विकासाची कामे सुरु करता आलेली नाहीत. तसेच ३ प्रकल्पांचा करारनामा संपुष्टात आलेला आहे. यापैकी घोडाझरी पर्यटन केंद्र विकासाकरिता ३० वर्षे कालावधीकरिता निविदा काढण्यास्तव नियामक मंडळाची मान्यता प्राप्त करण्याकरीता प्रारूप ठराव सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावरून प्रगतिपथावर आहे.

(२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या दि. १३.०२.२५ रोजीच्या परिपत्रकान्वये, नियमित देखरेख करण्याबाबत महामंडळातंर्गत पर्यटन विकासाकरीता असलेल्या मोठया व मध्यम प्रकल्पांकरीता प्रकल्पांचे संबंधित मुख्य अभियंता व लघु प्रकल्पांकरीता प्रकल्पांचे संबंधित अधीक्षक अभियंता यांची "नोडल अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तसेच सर्व नोडल अधिकारी यांनी दर महिन्याला करारनामा झालेल्या प्रकल्पांतर्गत असलेल्या पर्यटन विकास कामांचा प्रकल्पांच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही होत असल्याबाबत आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. ज्या विकासकाने पर्यटन विकासाची कामे सुरु केली नाहीत त्यांच्यावर निविदेतील अटी व शर्ती नूसार कार्यवाही करण्याचे क्षेत्रीय स्तरावरून प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

दिंडनेर्ली (ता. करवीर, जि. कोल्हापूर) प्रस्तावित उपसा सिंचन योजनेचा दुधगंगा मोठा प्रकल्प अंतर्गत समावेश होणेबाबत

(३५) ५९४८ (०१-०५-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडनेर्ली (ता. करवीर, जि. कोल्हापूर) प्रस्तावित उपसा सिंचन योजनेचा दुधगंगा मोठा प्रकल्प अंतर्गत समावेश करुन त्यास ३७०० कोटी रुपयांचा चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी जलसंपदा मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) : (१) होय.

(२) सदर उपसा सिंचन योजनेचा समावेश दुधगंगा प्रकल्पात करणेची मागणी आहे. तथापि, मंजूर तृतीय सुप्रमा मध्ये सदर योजनेचा समावेश करणेसाठी दुधगंगा प्रकल्पाचे जलनियोजन सुधारित करणे गरजेचे आहे तसेच कृष्णा पाणी तंटा लवाद मधील तरतुदीनुसार महामंडळाचे एकूण नियोजनाचे अनुषंगाने तपासणी करणे आवश्यक आहे.

दुधगंगा प्रकल्पाचे लाभक्षेत्रात काही गावांचा समावेश करणेचे अनुषंगाने लोकप्रतिनिधींच्या मागण्या आहेत. त्यानुषंगाने या सर्व बाबींचा एकत्रित अभ्यास करून दुधगंगा प्रकल्पाचे जलनियोजन सुधारित करणेची बाब विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील बंद अवस्थेत असलेली अनुदानित ग्रंथालये बंद करून त्याऐवजी नवीन ग्रंथालय उभारणेबाबत

(३६) ६४५५ (०५-०५-२०२५). श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून अनुदान मान्यता असलेली अनेक ग्रंथालये बंद अवस्थेत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंद अवस्थेत असलेल्या अनुदानित ग्रंथालयांची मान्यता रद्द करून त्याऐवजी नवीन अद्यावत ग्रंथालयाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (११-०७-२०२५) : (१) व (२) राज्यात मार्च, २०२५ अखेर ११,१५५ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. सन २०१२-२०१३ ते सन २०२४-२०२५ पर्यंत १७०६ अकार्यक्षम ग्रंथालयांची शासनमान्यता रद्द करण्यात आली आहे.

शासन निर्णय दिनांक २१.०२.२०१२, दिनांक २२.०३.२०१३ व दिनांक ०७.०६.२०१४ अन्वये सन २०१२-२०१३ पासून सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता देण्याची कार्यवाही बंद आहे.

सन २०१२-१३ पासून शासनमान्यता रद्द करण्यात आलेल्या अकार्यक्षम ग्रंथालयांऐवजी अन्य पात्र व्यवस्थापनाच्या ग्रंथालयांना विद्यमान निकषानुसार सरसकट "ड" वर्गात मान्यता देण्याचा प्रस्ताव शासन विचाराधीन आहे.

ग्रंथालय संचालनालयाच्या दिनांक ०२ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये अधिनस्त कार्यालयांकडून अकार्यक्षम ग्रंथालयांची माहिती मागविली होती. त्यानुसार विहीत नियमांतील तरतूदीनुसार राज्यात एकूण २९७ अकार्यक्षम शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आढळून आली आहेत. सदर अकार्यक्षम ग्रंथालयांसंदर्भात नियमानुसार पुढील कार्यवाही ग्रंथालय संचालनालयाकडून सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सन २००१ पुर्वीची मान्यता असलेल्या ७८ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत

(३७) ६५०९ (०५-०५-२०२५). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००१ पुर्वीची मान्यता असलेल्या ७८ वरिष्ठ महाविद्यालय, २४ तुकड्या, १४ विषय यांना अनुदान देण्याबाबत सन २०१० या कालावधीपासून पाच वेळा तपासणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वरिष्ठ महाविद्यालय तुकड्या व विषय यांना कायम विनाअनुदान शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी दिनांक २४ नोव्हेंबर,२००१ रोजी वा त्यासुमारास रितसर मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात सन २०१०, २०१४, २०१८, २०२१ व आता नव्याने 'इन कॅमेरा तपासणी' असा ०५ वेळा संबंधित ७८ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन विभागीय सहसंचालकाच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालानंतर या ७८ महाविद्यालयाच्या अनुदानासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०९-२०२५) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

नोव्हेंबर,२००१ पूवी कायम विना अनुदान तत्त्वावर शासन मान्यता दिलेली महाविद्यालये, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया, विषय यांना अनुदान देणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने एकुण ४ वेळा तपासणी करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

दिनांक १७.०५.२००१ रोजी तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली उपसमितीच्या बैठकीमध्ये तसेच दिनांक २४.११.२००१ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये कायम विनाअनुदानित शैक्षणिक धोरण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

i) सन २०१४, २०२०, २०२१ व २०२३ मध्ये नोव्हेंबर, २००१ पूर्वी कायम विना अनुदान तत्त्वावर शासन मान्यता दिलेली महाविद्यालये, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया, विषय यांना अनुदान देणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने एकुण ४ वेळा तपासणी करण्यात आली आहे.

ii) नोव्हेंबर, २००१ पूर्वी कायम विना अनुदान तत्त्वावर शासन मान्यता दिलेली महाविद्यालये आणि विद्याशाखा

यांना अनुदान देणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आलेला होता. तथापि, संबंधित महाविद्यालयांनी कायम विना अनुदानित तत्वाचे धोरण मान्य असल्याचे हमीपत्र मान्यतेवेळी दिलेले असल्याने आणि शासनाचे कायम विना अनुदान धोरण कायम असल्याने प्रस्तावास सहमती दर्शविलेली नाही.
(५) प्रश्नच उदभवत नाही.

"क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा" अभियानाच्या अंमलबजावणीबाबत

(३८) ६६८१ (०५-०५-२०२५). श्री.अनिल पाटील (अमळनेर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाळाबाहय मुलींचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांचे शिक्षण आणि विकासाच्या संदर्भात उपक्रम राबविण्यासाठी राज्यात मागील सात वर्षांपासून "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा" अभियान राबविले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात याची सुरुवात दिनांक ३ जानेवारी ते २६ जानेवारी दरम्यान राबविले जात असतांना शालेय शिक्षण विभागाने या अभियानाकडे पूर्णत: दुर्लक्ष करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील सात वर्षांपासून "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा" अभियान राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (०१-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या महान शैक्षणिक कार्याची ओळख राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने दिनांक ०२.०१.२०१६ व दिनांक ३०.१२.२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकांन्वये राज्यातील सर्व शाळांमधून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले लेक वाचवा लेक शिकवा अभियान राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२), (३), हे खरे नाही.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये, दिनांक ०३ जानेवारी २०२५ ते २६ जाने २०२५ या कालावधीत दिनांक ०२.०१.२०१६ व दिनांक ३०.१२.२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकांमधील सूचनांच्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले लेक वाचवा लेक शिकवा अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली असून, त्याअंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती पुढीलप्रमाणे आहे : -

- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली
- शाळेतील माजी कतृत्ववान विद्यार्थाचा सत्कार करणे शाळेच्या परिपाठात त्यांच्या प्रेरणादायी मुलाखती / मार्गदर्शन आयोजन करण्यात आले
- मुलांना पदवीधर होईपर्यंत शिक्षण न सोडण्याची प्रतिज्ञा देण्यात आली. मुलीच्या शिक्षणासाठी विशेष कार्य करण्याऱ्या महिला व्यक्तींचा सत्कार केला.
- आदर्शमातांना पुरस्कार वाटप केले.
- विद्यार्थी चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.
- मुलींसाठी मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आली व आरोग्य तपासणी करण्यात आली.
- प्रजासत्ताक दिनी विद्यार्थीनीचा सत्कार करण्यात आला, लोकगीते, सांस्कृतिक कार्यक्रम (क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनपटावर आधारीत) आयोजन करण्यात आले.

- लेक वाचवा लेक शिकवा आभियानातर्गत निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.
- क्रातीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रभातफेरी, गीतगायन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, नाटीका सादरीकरण करण्यात आले, मातापालकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.
- गुड टच बॅड टच बाबत शाळास्तरावर मार्गदर्शन आयोजित केले.
- गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी गृहभेटी पालक भेटींचे आयोजन करण्यात आले.
- गावामध्ये मुलीच्या शिक्षणांबद्दल प्रभातफेरी काढून जनजागृती करण्यात आली.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत

(३९) ७२३७ (०८-०९-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.संजय देरकर (वणी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.अभिजीत पाटील (माढा), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी कर्ज माफी योजना व महात्मा ज्योती फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजना व याशिवाय पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान या दोन्ही योजनांचे विषय ५ वर्षा पासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय वित्त मंत्रालयाने संसदेत दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवरील थकीत कर्जाचा बोजा ८.३८ लाख कोटी असून हे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक असल्याचे माहे एप्रिल २०२५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) उक्त योजनेंतर्गत लहान शेतकऱ्यांकडील दीड लाख रुपयांचे कर्ज माफ करण्याचे प्रस्तावित असून नियमित कर्जदारांना २५ हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान दिले जाणार होते, तथापि, गेल्या आठ वर्षापासून ६.५६ लाख शेतकरी निकषपूर्ती नंतरही योजनेच्या लाभांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी राज्यातील शेतकरी, शेतकरी संघटना तसेच लोकप्रतिनिधी यांचेकडून शासनाकडे वारंवार मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कर्जमाफी करण्याच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबासाहेब पाटील (२४-०९-२०२५) : (१) होय, अंशत: खरे आहे

(२) नाही,

अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) होय.

(४) होय,

कर्जमाफीसाठी शेतकरी तसेच शेतकरी संघटना व मा. लोकप्रतिनिधी यांचेकडून कर्ज माफीसाठी मागणी करण्यात येत आहे.

(५) शासनाकडून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना- २०१७ महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०१९ व महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना या तीन योजना राबविल्या आहेत. कर्जमुक्ती योजने अंतर्गत पात्र असलेल्या शेतकऱ्यांना त्यांनी घेतलेल्या कर्जापोटी अनुक्रमे रु. १.५ लाख व रु. २.०० लाख पर्यंतच्या थकित रकमेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच प्रोत्साहन लाभ योजनेअंतर्गत रु. २५००० व रु. ५०,००० पर्यंतचा लाभ पात्र शेतकऱ्यांना देण्यात आला आहे. सदर योजनांतर्गत आतापर्यंत अनुक्रमे रु. १८,७६२ कोटी, रु. २०,४९७.१३ कोटी व रु. ५,२१६.७५ कोटी रकमेचा लाभ संबंधित लाभार्थ्यांना प्रत्यक्ष वितरीत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे या योजनांतर्गत पात्र असलेल्या तथापि अद्याप लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमडापूर (जि.यवतमाळ) सिंचन प्रकल्पाच्या कालव्याला शेतकऱ्यांचा विरोध होत असल्याबाबत

(४०) ७३८४ (१९-०८-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमडापूर (जि.यवतमाळ) सिंचन प्रकल्पाच्या कालव्याकरीता सक्तीच्या अधिग्रहीत करण्यात येत असलेल्या जमिनीचे मोजमाप सुरु असताना शेतकऱ्यांनी त्यास विरोध केला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दरम्यान उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांसमोरच एका शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय कामात अडथळा आणला असे सांगून फुलसावंगी येथील १२ शेतकऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने यासंदर्भात माहिती घेऊन सदर आंदोलनकारी शेतकऱ्यांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२९-०९-२०२५) :(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) पोलिस स्टेशन महागांव, ता. महागांव, जि. यवतमाळ अंतर्गत दाखल केलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने सदर प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

शाळा मूल्यांकन प्रक्रिया सुरू करण्याबाबत

(४१) ७५३४ (०८-०९-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण १,०६,६८० शाळांपैकी १,८५० शाळांनी “शाळा मूल्यांकन” प्रक्रिया अद्याप सुरू केली नसल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा शाळांनी शाळा मूल्यांकन प्रक्रिया सुरू न करण्यामागील प्रमुख कारणे काय आहेत,

(३) तसेच वरील शाळेंचे मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (०७-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

१५ मे २०२५ अखेर राज्यातील एकूण १,०८,५३० शाळापैकी १,०१,१५१ एवढ्या शाळांनी (९३.७७ %) स्वयं-मूल्यांकन पूर्ण केले आहे, ५७६१ शाळांनी (५.१३%) स्वयं-मूल्यांकनात नोंदणी पूर्ण केले आहे तर नोंदणी न केलेल्या शाळांची संख्या १२५९ (१.१०%) इतकी होती.

(२) SQAAF पोर्टल वर स्वयं-मूल्यांकनासाठी सन २०२३-२४ मध्ये UDISE मध्ये नोंदवलेल्या शाळांची माहिती घेण्यात आली होती. राज्यातील सर्व मुख्याध्यापक यांनी सन २०२४-२५ मध्ये स्वयं-मूल्यांकन पूर्ण केले आहे. सन २०२४-२५ मध्ये स्वयं-मूल्यांकन प्रक्रिया सुरु न करण्यामागे कारणे खालीलप्रमाणे आहेत-

I. UDISE मध्ये केंद्र नमूद न करणे (शाळांची संख्या ५९)

II. UDISE मध्ये मोबाईल क्रमांक नमूद न करणे (शाळांची संख्या २५३)

III. सन २०२४-२५ मधील बंद शाळा (अंदाजित ६१६)

IV. तांत्रिक अडचणी असणाऱ्या शाळा (शाळांची संख्या ३३१)

(३) स्वयं-मूल्यांकन करण्याकरिता राज्यातील सर्व शाळांना दि.३०.०६.२०२५ ही अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली होती.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील सहा विभागांमध्ये टेक्निकल वस्त्रोद्योग पार्क व अठरा मिनी टेक्निकल टेक्स्टाईल पार्क उभारणेबाबत

(४२) ९७५३ (२३-०७-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहा विभागांमध्ये “टेक्निकल वस्त्रोद्योग पार्क” व अठरा “मिनी टेक्निकल टेक्स्टाईल पार्क” उभे करणार असल्याचे माहे २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी, सांगली जिल्ह्यातील विटा तसेच राज्यातील अनेक ठिकाणी सुरू असलेले हातमाग (हॅण्डलूम) व पावरलूम आठवड्यातून एकच दिवस

चालविण्यात येत असल्याने येथील हातमाग उद्योग बंद पडण्याच्या अवस्थेत असल्याने हातमाग व्यावसायिक आणि कर्मचाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ लागले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागातील हातमाग (हॅण्डलूम) आणि पावरलूमला उर्जितावस्था देण्यासाठी तात्काळ विशेष अनुदान देऊन दररोज किमान आठ तास हे हातमाग, पावरलूम चालवून व्यावसायिक व कामगारांना काम मिळवून देण्यासाठी शासन कोणती योजना आखणार आहे,
(४) असल्यास, या हातमाग व पावरलूम मधून तयार होणाऱ्या कपड्याचे शासनाच्या माध्यमातून व खाजगी व्यावसायिकाच्या माध्यमातून विक्री योजना राबवून सदर योजनेसाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे, तसेच कायम कर्मचाऱ्यांना पुन्हा रोजगार चालविण्यासाठी शासन कोणती कृती योजना आखणार आहे,
(५) असल्यास, या अनुषंगाने हातमाग प्रभावीपणे चालविण्यासाठी शासन कोणती उपाययोजना वा विशेष अनुदान देऊन या लोन मध्ये निर्माण होणारा हातमाग (हँडलूम) व पावरलूम मध्ये निर्माण होणारा कपडा एक्सपोर्ट करून उर्वरित कपडा देशभरातील सर्वच कंपन्यांना मार्केटिंग करून या उद्योगांना ऊर्जावस्ता देण्यासाठी शासन कोणते धोरण वा उपाययोजना करणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय सावकारे (१७-०९-२०२५) : (१) शासन निर्णय दि.०२/०६/२०२३ अन्वये राज्यात नवीन एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ जाहीर करण्यात आलेले आहे. या धोरणान्वये राज्यातील सहा महसूल विभागांमध्ये प्रत्येकी एक तांत्रिक वस्त्रोद्योग पार्क स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच शासन निर्णय दि.०६/०३/२०२४ अन्वये राज्यातील महसूली विभागामध्ये प्रत्येकी ३ असे एकुण १८ लघु वस्त्रोद्योग लघु वस्त्रोद्योग संकुल (Mini Textile Park Scheme) स्थापन करण्याची योजना सुरु करण्यात आली आहे.
(२) पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी, सांगली जिल्ह्यातील विटा तसेच राज्यातील अनेक ठिकाणी सुरू असलेले हातमाग (हॅण्डलूम) व पावरलूम आठवड्यातून एकच दिवस चालविण्यात येत असल्याने येथील हातमाग उद्योग बंद पडण्याच्या अवस्थेत आले असल्याने हातमाग व्यावसायिक आणि कर्मचाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ लागले असल्याचे निवेदन वा तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या नाहीत.

यंत्रमाग व्यवसाय हा आठवडयातुन सहा दिवस चालु असतात तर एक दिवस सुट्टी असते. तसेच सोलापुर विभागात १८१ हातमाग सहकारी संस्था नोंदणीकृत असून, यापैकी १३५ हातमाग संस्था चालु असून उर्वरित ४६ हातमाग सहकारी संस्था अवसायनात आहेत.
(३) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अन्वये राज्यात ५ वर्षात २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणुक व ५ लाख रोजगार निर्मीतीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणा अंतर्गत वस्त्रोद्योग विभागामार्फत वीजदर सवलत, भांडवली अनुदान, सौरउर्जा अनुदान, अशा विविध सवलतीचा लाभ राज्यातील यंत्रमाग घटकांना देण्यात येत आहेत.

तसेच हातमाग विणकरांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या विक्रीला चालना देण्यासाठी विशेष प्रदर्शनांचे आयोजन करणे तसेच प्रदर्शनामध्ये सहभागी होण्यासाठी विणकरांना मदत करणे, तसेच देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर हातमाग उत्पादनांना विशेष ओळख प्रदान करून देण्यासाठी उत्पादनांना “हातमाग मार्क”, “सिल्क मार्क “आणि “इंडिया हँडलूम ब्रँड “च्या माध्यमातून प्रोत्साहन देणे, हातमाग विणकर कुटुंबांना प्रतिमाह २०० युनिट पर्यंत मोफत वीज अनुदान योजना सुरु करण्यात आली आहे. राज्यातील पारंपारिक ५ वाणांच्या या क्षेत्रातील प्रमाणित व नोंदणीकृत हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्याकरीता पुरूष विणकर रू.१००००/- आणि महिला विणकरांना रू.१५०००/- उत्सव भत्ता गणेश चतुर्थी किंवा मकरसंक्रांती निमित्त मंजूर करून देण्याची

योजना सुरु करण्यात आली आहे. केंद्र शासन संख्यात्मक निर्बंधांसह धाग्यावर (डीबीटीद्वारे लिंक्ड बँक खात्यावर) १५% अनुदान देते. केंद्र शासन १५% व राज्य शासन १५% असे एकूण ३०% अनुदान हे कॉटन हॅंक धागा, घरगुती रेशीम, लोकरी आणि लिनन धागा आणि नैसर्गिक तंतूंच्या मिश्रित धाग्यावर कच्चा माल पुरवठा योजने अंतर्गत (आर.एम.एस.एस) हातमाग विणकरांना अतिरिक्त अनुदान देण्यात येत आहे.

(४) व (५) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या, नागपुर, व महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघ मर्या. मुंबई यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या, संस्थेकडील हातमाग विणकरांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या विक्रीला चालना देण्यासाठी विशेष प्रदर्शनांचे आयोजन करणे, तसेच सदर प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्यासाठी हातमाग विणकरांना मदत केली जाते. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर हातमाग उत्पादनांना विशेष ओळख प्रदान करून देण्यासाठी "हातमाग मार्क", "सिल्क मार्क "आणि "इंडिया हॅंडलूम ब्रँड "च्या माध्यमातून प्रोत्साहन देण्याकरीता नोंदणीकृत हातमाग विणकरांकडून तयार होणाऱ्या कापडाची विक्री महामंडळ/महासंघ यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

त्याबरोबर महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. मुंबई महामंडळाने त्यांचेकडे नोंदणीकृत असलेल्या राज्यातील यंत्रमाग सहकारी संस्था/ सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग (M.S.M.E) अंतर्गत नोंदणीकृत यंत्रमाग घटकांनी यंत्रमागावर तयार केलेल्या कापडाची विक्री महामंडळामार्फत विक्री करण्यात येते. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या. नागपुर, महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघ मर्या, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. मुंबई यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या, सहकारी संस्थाकडून उत्पादीत होणाऱ्या हातमाग व यंत्रमाग मालाच्या विक्रीकरीता, ऑनलाईन प्लॅटफॉर्मची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून प्रस्तावित आहे.

हातमाग व यंत्रमाग मधून तयार होणाऱ्या खाजगी व्यावसायिकाच्या माध्यमातून विक्री करण्याची अशी कोणतीही योजना वस्त्रोद्योग विभागामार्फत राबविण्यात येत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना सोसायट्यांचे सभासद करण्याबाबत

(४३) १०८३२ (१९-०८-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर तालुका पंचायत समितीच्या झालेल्या आमसभेत ग्रामीण भागातील सहकारी सोसायट्यांचा आढावा घेऊन पात्र शेतकऱ्यांना सहकारी सोसायट्यांचे सभासद करण्याची सूचना स्थानिक लोकप्रतिनिधींनी केल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षिण सोलापूर तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना सोसायट्यांचे सभासद करून घेतले जात नसल्याने हे शेतकरी शासनाच्या विविध योजनेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पात्र शेतकऱ्यांना सहकारी सोसायटयांचे सभासद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबासाहेब पाटील (१८-०९-२०२५) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

खातेदारांनी सोसायट्यांचे सभासदत्व मिळणेबाबत विहित नमुन्यात आवश्यक त्या कागदपत्रांसह स्वतंत्र अर्ज दाखल केल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, त्याखालील नियम १९६१ व संस्थेच्या मंजूर उपविधीतील तरतुदीस अधीन राहुन संस्थेचे सभासदत्व देणेबाबत कार्यवाही केली जाते.

(३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, त्याखालील नियम १९६१ व संस्थेच्या मंजूर उपविधीतील तरतुदीनूसार पात्र खातेदार शेतकरी यांना विविध कार्यकारी सहकारी संस्थेमध्ये सभासद करुन घेतले जाते.

दक्षिण सोलापूर तालुक्यात मार्च २०२५ अखेर ८२ विविध कार्यकारी सहकारी संस्था असून पात्र खातेदारांपैकी ३९,३५८ खातेदारांना विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे सभासदत्व दिलेले आहे. तालुक्यातील कोणत्याही पात्र शेतकऱ्याला विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे सभासद करुन घेत नसलेबाबतची तक्रार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दक्षिण सोलापूर अथवा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर कार्यालयाकडे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात नवीन सहकारी साखर कारखान्यांना परवानगी देणेबाबत

(४४) १११८३ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यातील खाजगी कारखान्यांविरोधात व सहकारी साखर कारखाना स्थापनेबाबत सहकार मंत्री यांचे न्यायालयात क्रमांक आर.व्ही.ए.-२०१५/प्र.क्र.४०७/१५ याबाबत दिनांक २२ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यादरम्यान सहकार मंत्री यांनी सुनावणी घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अद्यापपर्यंत एकही सुनावणी झाली नाही व निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील नवीन सहकारी साखर कारखान्यांना परवानगी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबासाहेब पाटील (१०-०९-२०२५) :

(१) होय, हे खरे आहे.

दि. २२ फेब्रुवारी, २०१७ रोजी, प्रकरण क्रमांक आर व्ही ए २०१५/प्र.क्र.४०७/१५ स या प्रकरणाची सुनावणी, मा. मंत्री (सहकार) यांचेसमोर घेण्यात आली होती.

(२) अंशत: खरे आहे.

या प्रकरणाची दि. २२ फेब्रुवारी, २०१७ रोजी सुनावणी झाली असून, या प्रकरणी अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मंगळूरपीर (जि.वाशिम) तालुक्यातील आडाण नदीपत्रात बोरव्हा बॅरेज घोटा, शिवनी बॅरेज आणि सत्तर सावंगा बॅरेज (संग्रह) या तीन प्रकल्पासाठी शेतकऱ्याना भूसंपादन देण्याबाबत

(४५) ११२१५ (१९-०८-२०२५). श्री.श्याम खोडे (वाशिम) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळूरपीर (जि.वाशिम) तालुक्यातील आडाण नदीपत्रात बोरव्हा बॅरेज घोटा, शिवनी बॅरेज आणि सत्तर सावंगा बॅरेज (संग्रह) या तीन प्रकल्पासाठी जलसंपदा विभागाने एकूण ५६९ कोटी ६५ लाख रुपयांच्या खर्चास नव्याने प्रशासकीय मान्यता देऊन या प्रकल्पाचे काम सुरू झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधीस मान्यता मिळूनही अद्याप भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने, आधी जमीन मोजा आणि नंतरच कामे सुरू करा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन (२९-०९-२०२५) :(१) होय.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
घोटा शिवणी बॅरेज, बोरव्हा बॅरेज, सत्तर सावंगा बॅरेज या प्रकल्पांचे नदीपात्रातील शासकीय जमिनीवरील बांधकाम शेतकऱ्यांशी समन्वय साधून सुरु आहे. तिन्ही प्रकल्पांकरीता आवश्यक जमिनींचे एकूण ३१ (८१३ हे.) भूसंपादन प्रकरणे महसूल विभागाकडे विविध कलमांखाली प्रगतीत आहेत. त्यापैकी धरण रेषेकरीता आवश्यक जमिनीची संयुक्त मोजणी प्रक्रिया पूर्ण झालेली असून पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

काळूस व पवळेवाडी (जि.खेड, जि.पुणे) विविध कार्यकारी सेवा सोसायटी मर्या. सोसायटीची चौकशी होणेबाबत

(४६) १२०७५ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काळूस व पवळेवाडी (जि.खेड, जि.पुणे) विविध कार्यकारी सेवा सोसायटी मर्या. यांना सहायक निबंधक,सहकारी संस्था, खेड यांनी दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी आदेश देऊन सदर आदेशात नमूद परिशिष्ट "अ" मधील व्यक्तींना संस्थेचे सभासदत्व बहाल करण्यास सांगितले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशान्वये संबंधित संस्थांनी काहीही कार्यवाही केली नाही, सदर आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींच्या पत्रानुसार दिनांक २० मे, २०२५ रोजी वा त्या दरम्यान सभासदत्व देण्यासाठी अधिकारी प्राधिकृत केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेत जे सभासद होते मात्र ते मयत झाले आहेत त्यांच्यानंतर त्यांचे वारसांना सभासद करून घेतले जात नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने शासन प्राधिकारी यांचे आदेश न मानणे आणि मनमानी कारभार करणे शेतकऱ्यांना संस्थेचे सभासत्व देण्यास टाळाटाळ करून त्यांना प्राप्त होणाऱ्या लाभापासून वंचित ठेवणे, सभासद वारस यांना सभासदत्व न करणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबासाहेब पाटील (१८-०९-२०२५) :(१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पवळेवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे संचालक मंडळ सभा दि. २९.०५.२०२५ रोजी ठराव करुन परिशिष्ट "अ" मधील नमूद १५ व्यक्तींना सभासद करुन घेतले. तदनंतर परिशिष्ट "अ" मधील नमूद ६ व्यक्तींना सभासद करुन घेतले, असे एकंदरीत परिशिष्ट "अ" मधील नमूद केलेल्या एकूण व्यक्तींमधून २१ व्यक्तींना सभासद करुन घेतले आहे.

तसेच काळूस विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे संचालक मंडळ सभा दि. २७.०३.२०२५ रोजी परिशिष्ट "अ" मधील नमूद १० व्यक्तींना सभासद करुन घेतले. तदनंतर संस्थेचे संचालक मंडळ सभा दि. १०.०६.२०२५ रोजी परिशिष्ट "अ" मधील नमूद ३८ व्यक्तींना सभासद करुन घेतले, असे एकंदरीत परिशिष्ट "अ" मधील नमूद केलेल्या एकूण व्यक्तींमधून ४८ व्यक्तींना सभासद करुन घेतले आहे.

परिशिष्ट "अ" मधील नमूद केलेल्या व्यक्तींमधून सभासदत्व देणेसंदर्भात सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. खेड या कार्यालयाने त्यांच्या दि. २०.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्राधिकृत अधिका-यांची नेमणुक केली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

मयत सभासदांच्या वारसांनी संस्थेचे सभासदत्व मिळणेसाठी वारस नोंद करणेबाबतची अनुषंगिक कागदपत्रे संस्थेकडे दाखल केलेले नाहीत.

(४) होय, चौकशी केली आहे.

चौकशीनंतर संस्थेच्या काही पात्र सभासदांना संस्थेने सभासदत्व दिलेले आहे.

(५) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. खेड यांच्या स्तरावरुन तपास सुरु असून, तपासात संस्थेकडून हलगर्जी पणा झाल्याचे आढळल्यास संस्थेवर पुढील यथोचीत कार्यवाही करण्यात येईल.

राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य भाव देण्याबाबत

(४७) १३२३६ (०८-०९-२०२५). डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये आगामी रब्बी व खरीप हंगामात कापूस पिकात घट होण्याचा स्पष्ट अंदाज कृषि विभागाच्या प्राथमिक अंदाजात जाहीर झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावनेर तालुक्यातील (जि. नागपूर) येथे गेल्या वर्षाच्या तुलनेत कापूस क्षेत्रात घट झाल्याचे सावनेर तालुका कृषी विभागाने प्राथमिक अंदाज जाहीर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगस बियाणे, खताचा तुटवडा, शेतकऱ्यांच्या पिकाला वाजवी भाव मिळत नसल्याने कापूस क्षेत्रात घट होत असल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खत व बियाणांची योग्य मागणी, तसेच वारंवार होणारा काळाबाजार रोखणे कामी तसेच शेत पिकाला योग्य भाव देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (०३-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सावनेर तालुक्याच्या मागणीप्रमाणे खते व बियाणे यांचा पुरवठा करण्यात आलेला आहे. शेतकऱ्यांना दर्जेदार व गुणवत्तापुर्ण कृषि निविष्ठ पुरविण्यासाठी तालुक्यातील गुणवत्ता निरिक्षकाद्वारे कार्यवाही करण्यात येत

आहे.

हंगाम २०२५-२०२६ करीता केंद्र शासनाव्दारे कापसाचे हमी दर जाहीर करण्यात आले आहेत. मध्यम धाग्याच्या कापसाच्या हमी दरात हंगाम २०२४-२०२५ च्या तुलनेत रु. ५८९/- प्रति क्वि. वाढ करुन रु. ७७१०/- प्रति क्वि. हमी दर तर लांब धाग्याच्या कापसाच्या हमी दरात रु. ५८९/- प्रति क्वि. वाढ करुन रु. ८११०/- प्रति क्वि. हमी दर जाहीर करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

इयत्ता नववीच्या पायाभूत चाचणी (PAT-२) प्रश्नपत्रिका फुटल्याबाबत

(४८) १३४८९ (०८-०९-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) मार्फत घेतल्या जाणाऱ्या पायाभूत चाचणी परीक्षा क्रमांक दोन (PAT-२) अंतर्गत इयत्ता नववीची प्रश्नपत्रिका फुटल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रश्नपत्रिकेचा संपूर्ण पेपर आणि तो कसा सोडवायचा याबाबतचा व्हिडिओ यु ट्यूबसारख्या सार्वजनिक मंचावर प्रसारित झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळलेल्या अधिकारी व यु ट्यूब चॅनलविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (०७-१०-२०२५) : (१)महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद मार्फत घेतल्या जाणाऱ्या पायाभूत चाचणी परीक्षा नसून संकलित चाचणी-२ (PAT-३) हि चाचणी आहे. सदर (PAT-३) अंतर्गत इयत्ता नववीची संकलित चाचणी-२ मूल्यमापन परीक्षा दि.८ एप्रिल २०२५ पासून सुरु करण्याचे सर्व शाळांना कळविण्यात आले होते. सदर चाचणी मधील चाचणीपत्रिका युट्युबसारख्या सार्वजनिक मंचावर प्रसारित झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) युट्युबवरील काही चॅनलवर दि.०८.०४.२०२५ रोजी सुरु होणाऱ्या (PAT-३) अंतर्गत इयत्ता नववीची संकलित चाचणी-२ मूल्यमापन परीक्षेतील प्रश्न तसेच उत्तरे ही युट्युबवर प्रसारित करण्यात आली होती.
(३) PAT अंतर्गत इयत्ता नववीची संकलित चाचणी २ मूल्यमापन परीक्षा दि.८ एप्रिल २०२५ पासून सुरु करण्याचे सर्व शाळांना कळविण्यात आलेले होते. सदर चाचणी मधील चाचणीपत्रिका युट्युबसारख्या सार्वजनिक मंचावर प्रसारित झाल्याचे दि.७ एप्रिल २०२५ रोजी निदर्शनास आले होते . ज्या २२ युट्युब चॅनेलवर मूल्यमापन परीक्षेतील प्रश्न तसेच उत्तरे प्रसारित करण्यात आली होती अशा चॅनलविरोधात दि. ७ एप्रिल २०२५ रोजी पुणे येथे विश्रामबाग पोलिस ठाणे येथे प्रथम खबरी अहवाल नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील एकूण ०३ आरोपी यांचे विरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पाटबंधारे (दक्षिण) विभागीय कार्यालय कोल्हापूर येथून चंदगड किंवा गडहिंग्लज येथे स्थलांतरित करण्याबाबत

(४९) १३६३९ (२४-०७-२०२५). श्री.शिवाजी पाटील (चंदगड) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड, आजरा, गडहिंग्लज व भुदरगड तालुक्याकरिता असलेल्या विभागीय कार्यालय ह्या चार तालुक्यांऐवजी कार्यक्षेत्राबाहेर कोल्हापूर येथे अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक जनतेला कामाकरिता (नाहरकत पत्रे / अडचणी संदर्भात / निविदा / देयके इ.) विनाकारण कोल्हापूरच्या फेऱ्या माराव्या लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाटबंधारे (दक्षिण) विभागीय कार्यालय कोल्हापूर येथून चंदगड किंवा गडहिंग्लज येथे स्थलांतरित करण्यात यावे,

(४) सदर कार्यालय चंदगड किंवा गडहिंग्लज येथे स्थलांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.लोकसेवेच्या हेतुने व सिंचन कामकाजासाठी या विभागाचे कार्यक्षेत्रामध्ये (चंदगड, आजरा, गडहिंग्लज व भुदरगड तालुक्यामध्ये) उपविभाग व शाखा कार्यालये कार्यरत आहेत. सबब, स्थानिक जनतेला आवश्यक सर्व सेवा पुरविणेसाठी व त्यांचा निपटारा करणेसाठी सदर उपविभाग व शाखा कार्यालये क्षेत्रीय स्तरावर कार्यरत आहेत. निविदांची कार्यवाही online होते. तसेच कामांची देखरेख क्षेत्रीय स्तरावरुन केली जात असून त्यांचेद्वारे देयके तयार केली जातात व सदरची देयके ही संबंधीत क्षेत्रीय स्तरावरील उपविभागामार्फत अदायगीसाठी विभागीय कार्यालयात सादर केली जातात. त्यामुळे स्थानिक जनतेला विनाकारण कोल्हापूरच्या फे-या माराव्या लागतात अशी वस्तुस्थिती नाही.

(३) उपरोक्त २ प्रमाणे वस्तुस्थिती असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पलुस (जि.सांगली) तालुक्यात गोदामे, शीतगृहे वाढविण्याबाबत

(५०) १४१०० (१९-०८-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पलुस (जि.सांगली) तालुका हा शेतीप्रधान असून येथे अन्नधान्य साठवणूकीच्या सुविधा उपलब्ध नसल्याने शेतक-यांना मिळेल त्या भावात धान्यांची विक्री करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साठवणूकीच्या सुविधा उपलब्ध नसल्याने त्याठिकाणी गोदामे व शीतगृहांची संख्या वाढविणे आवश्यक असून येथील शेतक-यांची तशी मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (२४-०९-२०२५) :

(१) हे खरे नाही.

सांगली जिल्हातील पलुस तालुक्यात प्रामुख्याने ऊस, द्राक्ष व भाजीपाला तसेच सोयाबीन, हरभरा, मका व इतर कडधान्य इत्यादीचे उत्पादन होते.

पलुस, जि.सांगली येथे अन्नधान्य साठवणूकीसाठी पलुस कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात प्रत्येकी २५० मे.टन क्षमतेची २ गोदामे व १००० मे.टन क्षमतेचे एक असे एकूण १५०० मे.टन क्षमतेची तीन गोदामे उपलब्ध आहेत. तसेच वखार महामंडळाचे सांगली जिल्ह्यात मिरज येथे ८५६ मे.टन क्षमतेचे शीतगृह उपलब्ध असून मिरज, वाळवा व तासगाव येथे २४,५३० मे.टन क्षमतेची एकूण १५ गोदामे उपलब्ध आहेत.

(२) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांच्याकडे कोणतीही मागणी प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.